# ॥ चैतन्य लहरी ॥

सन १९९५-९६ क्र.११ व १२



"माझे स्वप्न हेच आहे की, प्रेमधारांमध्ये चिंब झालेले, आपापसात प्रेमाचा आनंद वाटणारे, एकमेकांच्या संगतीचा आनंद घेणारे व माणसा - माणसांचे संबंध सुधारणारे असे सर्व सहजयोगी मला सगळीकडे दिसावेत.

गुरु पूजा भाषण, कबेला २८ जुलै १९९६ - श्री माताजी निर्मला देवी

# गुरु पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवी
## भाषण : कबेला २८ जुलै १९९६
## (सारांश)

भारतामध्ये गुरुपूजेची प्रथा पुरातन काळापासून चालत आली आहे. त्यावेळी थोर साधक होते आणि त्यांचे गुरु दूर जंगलामध्ये रहात असत: त्यांच्या परवानगीमधूनच ते त्यांच्याजवळ राहून आत्मसाक्षात्कार मिळवीत होते. भारतांमध्ये प्राचीन काळी खूप ऋषी मुनी असत. भारतामध्ये संरचित असा धर्म नसल्यामुळे ही पध्दत सुरु झाली: तिथें पाप- पाद्री असा प्रकार नाहीं.

त्याकाळचे पुजारी फक्त देवळांमध्ये पुजा-आरती करत पण साक्षात्कार देण्यासाठी, जीवनाच्या उच्च स्थितीबद्दल चर्चा करण्यासाठी सर्वांना महान अशा साक्षात्कारी ऋषीकडे जावे लागत होते आणि कुणाला शिष्य म्हणून स्वीकारायचे व कुणाला नकार द्यायचा हा पूर्ण अधिकार त्या गुरुनांच होता. आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक साधकांची, तो साक्षात्कार घ्यायला योग्य आहे की नाही याची कठोर परीक्षा गुरु करीत असे. ही परीक्षा इतकी अवघड व कठीण असायची, कधी इतकी क्रुर पध्दत असायची की फार थोडे साधक ती पार करु शकत. सहजयोगासारखे ते नव्हते, इथें प्रत्येकजण सहजयोगी असतो. त्यामुळे त्या काळी साक्षात्कार होणें ही फार दुर्मिळ गोष्ट होती; शिवाय त्यांचे हे गुरु आपले अधिकारपद कधीचं सोडत नव्हते. त्यांची परवानगी मिळाली तरच त्यांच्याकडे येणाऱ्यांना आश्रमात त्यांच्याजवळ राहण्याची सोय होत होती. कितीही मैल दूर अंतरावरुन साधक आला असला तरी नाहीं; त्याला भेटण्याचंही कांही बंधन गुरुंना नसे. कदाचित् त्यांच्याजवळ तसे प्रेम वा अनुकंपा नसेल; सत्य जाणण्याची त्यांची प्रामाणिक धडपड आहे व त्या प्रयत्नांत त्यांना त्रास होऊ नये असं त्या गुरुंना समजले नसावे. त्या बाबतींत त्यांना चिंता वाटत नसावी. शिष्यांची सतत परीक्षा घेणे हाच त्यांचा मार्ग होता. शिवाजी महाराज जन्मतःच साक्षात्कारी होते तरीही त्यांचे गुरु रामदास यांनी शिवाजीची अनेक प्रसंगी परीक्षा घेतली.

हे गुरुपद व अधिकार मिळवण्यासाठी त्यांना खूप कष्ट करावे लागले आणि मगच ते संत झाले. पण सहजयोगाची गोष्ट वेगळी आहे. मला वाटले की लोकांना आत्मसाक्षात्कार झाला की, आपलं काय काय चुकत आहे हे त्यांचे त्यांनाच कळेल; ते आत्मपरिक्षण करु शकतील; स्वतःला सुधारु शकतील. हे पुष्काळांच्या बाबतीत खरं ठरले आहे. पण अजूनही कांही जण रेंगाळत आहेत. आपण सहजयोगी झालो म्हणजे फार मोठे, विशेष झालो असं समजून पूर्वी सारखंच त्यांचं सारं चालूं आहे. ही गैरसमजूत अनेक प्रश्न निर्माण करत आहे, त्यामुळे ते स्वार्थी व संकुचित वृत्तीचे झाले आहेत व इतर लोकांना हे कसले सहजयोगी असं वाटूं लागले आहे.

आपण हे लक्षांत घेतले पाहिजे की परमचैतन्याची ही प्रेमशक्ती पूर्वी कधी नव्हती इतकी आंता कार्यान्वित झाली असल्यामुळेच हा सहजयोग आतां शक्य झाला

आहे. मी " आई " असल्यामुळेच हे घडून आले आहे. या प्रेमशक्तीच्या कार्यामुळेंच तुम्हाला साक्षात्कार मिळून तुम्ही आत्मसाक्षात्कारी जीवाच्या स्थितीला आला आहांत. तरीपण तुम्हाला ध्यान आत्मपरिक्षण व समर्पण यांच्याकडे लक्ष द्यायला हवे. बरेच जण तसे चांगले झाले आहेत पण अजूनही पुष्कळांना आपण सारं काही प्राप्त केले आहे असं वाटत असते. आत्मपरिक्षण करुन आपण हे बधितले पाहिजे की स्वतःबद्दल आपण किती जागरुक आहोत? सदान कदा आपण आपल्याला हा त्रास आहे, हे प्रश्न आहेत. अमकं करायला पाहिजे, तमकं करायला पाहिजे असा विचार करत राहू नये. तुमचं चित्त यामध्येच सारखं गुंतून राहिले तर तुम्ही स्वतःबद्दलच्या मानसिक प्रभावातून व स्वार्थी वृत्तीतून बाहेर येऊ शकणार नाही. हा स्वार्थीपणा किंवा अहंकारच तुमच्या प्रगतीमधला मोठा अडसर होतो. संताना कुठेही राहिले तरी चालते; माझंच पहा, मी सदैव आनंदात असते, कुठेही राहू शकते व झोपू शकते, माझ्या कसल्याही मागण्या नसतात. पण जर तुम्ही नेहमीं आपल्या शारिरीक आरामचाचा वा त्रासाचा विचार करत असाल तर तुम्ही त्यांच अवस्थेमध्ये रहाल, त्या स्थितींच्या वर येऊ शकणार नाही आपण कसं दिसतो, काय कपडे घालावेत, काय - काय अंगावर घालयचे हेच विचार करत राहिलात तर चांगले सहजयोगी बनू शकणार नाही. सहजयोग्यांमधला हा एक प्रकार आहे की, ज्यांना सर्व सुख-आराम हवा असतो. अशा आरामांत रहायची सवय जर झाली असेल तर चक्क रस्त्यावर झोंपायचा प्रयत्न करा. शरीराला ज्या गोष्टी हव्याशा वाटतात त्याची आता तुम्हाला जरुर नाहीं हे समजण्याचा सर्व प्रयत्न करा. मी म्हणजे हे शरीर नाही, मी शरीराच्या पलीकडे आहे ही मोठी गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. काही आराम करायला मिळाला तर ठीक, नाहीं मिळाला तरीसुध्दा ठीक. सहजयोग्याने संतासारखं राहिले पाहिजे. यांचा अर्थ तुम्ही संन्यासी झालं पाहिजे असा नाही पण तुमची शरीराची अशी धारण हवी की तुम्हीच शरीरावर नियंत्रण ठेऊं शकाल. वाटेल त्या ठिकाणी तुम्हाला झोप लागणार नाही असं कसं होईल किंवा मिळेल त्या जागीं तुम्हाला झोप कां येणार नाही? आतां त्यांना बाथरुमची चांगली व्यवस्था असलेली जागा हवी, हे हवे ते हवे दुःख सर्व सवयी होण्याचं कारण हेच की तुम्ही स्वतःकडे फार लक्ष देता. म्हणजे जाणीवेच्या वरच्या स्थितीवर कसे येणार? तुम्हाला सारं काही टिप-टॉप हवे आणि दुस-या कुणी त्याच्यांत ढवळाढवळ केलेली तुमहाला आवडत नाही. एकदा माणूस म्हातारा असला, त्याला वाटेल त्या परिस्थितीत जमवून घेणं जमणार नसेल तर मी समजूं शकते; अशा माणसांना थोडयाशा आरामदायक व्यवस्थ असायलाच हवी. पण आजकाल तरुण लोकं पण अशा आरामाच्या व सुखाच्या मागे लागलेले दिसतात सहजयोगांत हे चालत नाही.

पाश्चिमात्य लोक या बाबतीत खरंच बरे असतात हे मी पाहिले आहे. भारतांत आल्यावर त्यांना लक्झारी बसपेक्षा साध्या एसुटी बसमधून प्रवार करायला आवडते. कां असं मी विचारलं तर म्हणतात, माताजी बसमध्ये धक्के खात उडत उडत जायला मजा वाटते, सामान पण असंच उडया मारत राहते, खिडक्या उघडयाच असल्यामुळे मोकळी हवा मिळते. सगळं काही सहज चालल्यासारखे हे छान आहे. त्यांना बैलगाडीमधून जायला हवं होते. या सर्वापासुन ते आनंद मिळवतात. तसं पाहिलं तर पाश्चमात्य देशातल्या लोकांना आजकाल खेडवळ राहणी पसंत पडायला लागली आहे. आरामाच्या! कृत्रिम राहणीपेक्षा अशा खेडवळ वातावरणांत त्यांना जास्त मजा वाटते. मी जेवढे पाश्चमात्य देशांतले लोक (सहजयोगी) पाहिले आहेत ते कुठेही राहू शकतात, त्यांना खायला जे असेल ते चालते; हे सर्व कौतुकास्पद आहे. " तुम्ही काय खाल्लेत " असं विचारल तर म्हणतील "माताजी मला ठाऊक नाही " अशा माणसाची खूण हीच कीं त्याला आपण काय खातो काय आपल्याला मिळणार आहे याची पर्वाच नसते; हे हवं ते नको हे शब्द पण त्याच्याकरतां संपून जाता. असं असणं मुळीच कठीण नाही, अजिबात अवघड नाही. तुम्हाला वाटेल की मी तुम्हाला न जमणारे असं काहीं भलतंच सांगते

आहे ; पण हे अगदी सोपे आहे. तुम्हाला जर तुमच्या आजूबाजूच्या लोकांवर छाप पाडाची असेल तर तुम्ही संतासारखे बनायला हवें. तुम्ही जर सारखी कुरबुर करणार असाल तर तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहांत असा प्रभाव लोकांवर पाडू शकणार नाहीं.

पुष्कळ लोक मला सांगतात की माताजी लोकांना पुष्कळ कष्ट करुन, हिमालयांत जाऊन, निरनिराळी तपे करुन साक्षात्कार मिळवावा लागला. मग या लोकांना तुमचे आशीर्वाद कसे मिळाले? त्यांना साक्षात्कर घेण्याचा अधिकार होता का? त्यांनी काय मिळवले? मी म्हणाले की यांना फक्त तिच इच्छा होती. साक्षात्कार मिळावा अशी तीव्र भावना त्यांना होती आणि म्हणून त्यांना साक्षात्कार मिळाला. पण आतां नुसती इच्छा असणें पुरेसे नाही. तुम्ही आतां स्वतःवर विश्वास ठेवायला हवा. आत्म्याच्या प्रकाशांत कुठे काय चुकत आहे हे पहायला हवे. हे फार महत्त्वाचे आहे. स्वतःलाच प्रश्न विचारित रहा मी हे कां

मागतो, मला हे कां हवे, त्याचा काय फायदा? जगांत तुमच्या आजूबाजूला लोक नको त्या गोष्टींच्या मागे लागलेलेतुम्ही पाहतांच. ज्यामध्ये काही अध्यात्मिकता नाही अशा गोष्टी त्यांना हव्याशा वाटतात. अध्यात्मिक जीवन समाधान देणार असते. तुमचा आत्मा जर प्रकाशित असेल तर तुम्ही स्वतःशी समाधानी असता. या आंतरिक समाधानामधूनच तुम्ही आनंदाच्या सागरांमध्ये उतरता.

सहजयोगामध्ये या स्थितीला " निरानन्द " म्हणता. निरानन्द म्हणजे त्या आनंदाला कशाची जरुरी नाही. आनंद हा आनंदच असतो. त्याचाच तुम्हीआनंद उपभोगता. तुम्हाला तो मिळवण्यासाठी कशाची जरुर पडत नाही ; त्या आनंदी अवस्थेमध्येच तुम्हाला समाधान मिळत राहते ; त्यालाच निरानन्द स्थिति म्हणतात.

संत लोक जीवन कसे जगले हे जर तुम्ही जाऊन पाहिले तर तुम्ही आश्चर्यचकित व्हाल, ते कसे राहू शकले त्याचे तुम्हाला फारच आश्चर्य वाटेल. किती दिवस आपण उपाशी आहोत याचीही त्यांना फिकीर नव्हती. आपण उपाशी ही जाणीवदेखील त्यांना नसायची. खायला अन्न नाही. तर नाही अशी त्यांची वृत्ती होती. पण आतां तुम्हाला असले त्रास होणार नाहींत. कारण आता तुम्हाला साक्षात्कार झाला आहे आणि त्यामध्ये तुम्ही ही शक्ती मिळवू शकाल.

सहजयोग्यांची आणखी एक गोष्ट मला दिसते. काहीजणांना दुसऱ्या सहजयोग्यांबद्दल आकस असतो. सहजयोग हा प्रेमाच्या व करुणेच्या आशीर्वाद आहे. सहजयोग्यामध्ये एकमेकांबद्दल व्देष, सूड किंवा राग या भावनांना स्थानच नाही. जर तुम्हाला तशी भावना असेल तर तुम्ही तिच्यावर काबू मिळवला पहिजे. एकादा शीघ्रकोपी किंवा रगीट माणूस भेटला तर ती एक संधीच मिळाली असं समजा आणि त्याच्याशी मैत्री जमवा. त्या व्यक्तीबरोबर आपण सुसंवाद करु शकतो वां नाही हे बघा. एकादा रडकुंड्या माणूस भेटला तर त्याच्याशीही मैत्री जमवा. त्यामुळे तुम्म्हाला असं शांत वाटेल की तुम्ही राग, संताप या सगळ्याच्या पार व्हाल. काही सहजयोग्यांना फार लवकर राग येतो. मी म्हणेन की ते सहजयोगीच नाहीत. कारण जर तुम्हांला राग आवरता येत नसेल तर तुमच्यामध्ये प्रेमाची व करुणेची शक्ति कशी कार्य करु शकणार. पण तुम्हाला आपला राग आवरणे आवडतच नसेल तर इलाज नाही.

फार पूर्वी ऋषी लोक फार रागीट होते. त्यांना जगांतला मूर्खपणा आजिबात खपत नसे ; ते लोकांच्यापासून दूर जाऊन रहायचे.एक नित्यांनद स्वामी नावांच्या साधूला मी ओळखत होते, मी झाडावर रहायचा आणि कोणी त्यांच्याजवळ येण्याचा प्रयत्न केला तर त्याच्यावर दगड फेकायचा. त्याला रागीट माणसे अजिबात आवडत नसत. पण तुम्हाला असं करायची जरुन नाही. कारण तुम्हाला जे त्रासदायक व कुरबुर करणारे आहेत त्यांच्याकडूनही प्रेम व आदर मिळवण्याची क्षमता तुमच्याजवळ आहे. थोडासा प्रयत्न केला तर तुम्हाला हे सहज साधेल साधारणपणे एकादा रागीट माणूस भेटला तर त्याच्यापासून दूर जावंस लोकांना वाटतेः चांगल्या स्वभावाच्या माणसांबरोबर मैत्री जमवली तर त्यांत काय

मोठेपणा? हा कसला चांगुलपणा? हा कसला गोड स्वभाव झाला? पण तुम्ही त्या रागीट माणसावरोवर कसं बोलता, त्याच्याशी संवाद कसा जमवता. त्याच्याशी कसं जमवून घेता हे महत्वाचे आहे. तुमच्याजवळच्या प्रेमामध्ये ती व्यक्ति विरघळून जाईल कारण तो ही सहजयोगीच असतो. म्हणून तुमची वागणूक अतिशय प्रेमळ, करुणामय व गोड असली पाहिजे.

आणखी एक लक्षात घेण्याची महत्वाची गोष्ट ही की आपल्याला जो साक्षात्कार मिळाला तो " आई " च्या प्रेमशक्तीतून केवळ करुणा म्हणून मिळाला. फक्त आईच्या करुणेमधूनच हे घटित झाले. आता हया प्रेमशक्ती (लहरी) जरी दगडावर किंवा डोंगरावर वा तशाच घन वस्तूंवर आली तरी त्या लहरी तरंगासारख्या परत येतील, त्या परत यायलाच हव्या. तसं तुम्ही साक्षात्कार मिळाल्यानंतर हे नीट लक्षांत घ्या की प्रेम व करुणा हयाच शक्त्या तुम्हांनाही प्राप्त झाल्या आहेत. याच्याशिवाय काही नाही. तुम्ही जर स्वतःवरच प्रेम करत व स्वतःशी काळजी घेत रहाल. फक्त तुमच्याच कुटुंबाचा व मुला-बाळांचा सांभाळ करत बसलात, तर तुम्ही विशेष काहीच मिळवलं नाही. तुम्ही स्वतःचीच काळजी करत बसता तेंव्हा तुम्ही त्याच मर्यादेमध्ये अडकून बसता. हे स्वाभाविक असले तरी या बंधनाच्या पलीकडे जाऊन तुमच्यातील प्रेमशक्तीचा कुठें उपयोग करता येईल हे शोधून पाहिलेत तर तुम्हाला ते शक्य होईल. जसं पाणी सगळीकडे आपल्या पातळीवरच राहवे तसे,ही तुमची करुणा सगळीकडे पसरु दे, सगळया खड्डयांमध्ये भरुन येऊ दे म्हणजे की एका पातळीवर येईल. पण जर तुम्ही फक्त स्वतःबद्दलच समाधानी रहाल आणि दुसऱ्यांची पर्वा करणार नाही; आपण सहजयोगी झालो म्हणजे कोणी मोठे विशेष झालो अशा समजुतीत रहाल तर ती तुमची मोठी व दुदैवी चुक होईल असंच मी म्हणेन.

आतां सहजयोग्याबद्दलची तिसरी गोष्ट म्हणजे ते म्हणतात " माताजी, आम्हाला परमेश्वराची भेट होऊ दे." याचं मला हसून येत. कारण ते अगोदरच झाले आहे. जसं तुम्ही समुद्रात आल्यावर म्हणालात की आम्हाला समद्राच्या तळा पर्यंत जायचं आहे, जर काय करणार? त्यासाठी तुम्ही खोल डुबी घेतली तर तुम्ही स्वतःहून तिथे पोचालच. त्याचप्रमाणे तुम्ही एकदा आत्मसाक्षात्कार मिळवला आणि या करुणेच्या सागरात आलात की आणखी काही मिळवण्याची जरुरच नाही. काहीतरी मिळवण्याची ही वृत्ती मानवाच्या शोधक प्रवृत्तीतून निर्माण झाली. आता ते सर्व संपले पाहिजे. आतां तुम्ही परमेश्वरी साम्राज्यांत आला आहात म्हणजे मला अमुक स्थिति मिळावी. तमुक स्थिति मिळावी हा विचार थांबवला पाहिजे. फक्त डुबी घ्या (भरारी घ्या), तुमच्या डोक्यांतील हे सर्व ओझं सोडून द्या म्हणजे सर्व काही घडून येईल. या करुणेच्या सागरामध्ये तुम्हाला विरघळून जायचे आहे.

अजूनही असे कांही लोक आहेत की त्यांना नेहमी पुढे पुढे करायची सवय आहे; विशेषतः भारतीय लोक. खरं तर जिथें जागा मिळेल तिथे त्यांनी शांतपणे बसून घ्यावे. तुम्ही पुढे बसला काय किंवा एका कोपऱ्यामध्ये अंधारात बसला काय, तुम्हाला माझी व्हायब्रेहान्स मिळतातच मग तुम्ही खास जागी बसण्याची जरु नाही: अशा राखीव खास जागेत बसलात तर विशेष काय मिळवले? गर्दीमध्ये मिसळून जाणे, प्रेम सागरामध्ये विरघळून जाणें हे महत्वाचे आहे. आपल्याला कसंही करुन पुढची जागा पटकवायला हवी वगैरे फालतू कल्पना आहेत. पुढें म्हणजे मागें, मागें म्हणजे पुढे असे आहे.

लोक अजूनही मुर्खपणाच्या गोष्टींमागे लागतात ही आश्चर्याची गोष्ट आहे. तर मग तुमचं मन कुठे भरकटत आहे. चित्त कुठे आहे? कसला विचार चालला आहे? तुम्ही जर निर्विचार झालात कीं तुम्ही समाधानी होता, आनंदी होता; मग तुम्हाला कांही मागावेसे, काही हवेसे वाटत नाही. पाहिजेच असं काय असते? त्यांत एवढं महत्वाचं काय आहे? या सर्व क्रिया अज्ञानामुळे चालतात. एकदां हरे-राम-हरे-कृष्णवाल्यांचा एक माणूस माझ्याकडे आला आणि म्हणाला तुम्ही एक थोर साध्वी आहांत; तुमच्याजवळ आयुष्यांतील

खुप सोयी सुविधा आहेत तर मग तुम्ही संत कसले? मी त्याला म्हटले की तू संत कशावरुन आहेस तर तो म्हणाला की मी माझे कुटुंब सोडून दिले. माझ्या गाड्या सोडून दिल्या, घरदार सोडून दिले, मुलाबाळांना सोडून दिले. तर मी म्हणाले की तुम्ही आणखी एक गोष्ट सोडून दिली आहे म्हणजे तुमची बुध्दि. तो म्हणाला की हे कशावरुन? तर मी म्हणाले की, सोपे आहे; मी काहीच सोडले नाही कारण काहीच धरले नाही, जर तुम्ही काहींच धरुन ठेवले नाही तर सोडायचा प्रश्नच कुठें येतो? आता या घरामध्ये किंवा माझ्या शरीरामध्ये तुम्हाला जर श्रीकृष्णच्या धूलिकणाइतके काही सापडेल असं तुम्हाला वाटेल तर ते तुम्ही घेऊन जा; पण ते त्याच्याइतके हवे. मग ते इकडे तिकडे शोधू लागले; मी म्हणाले तुम्ही काय सोडून दिले आहे ते आता बघा, फक्त दगड. मग तुम्ही या सोडून देण्याच्या गोष्टी अभिमानाने का सांगता? त्यांनी डोक्यावरचे केसही पूर्ण काढायला सुरुवात केली-आम्ही हे केले, आम्ही ते केले या सगळ्या फालतू गोष्टी आहेत. सहजयोगामधला कोणीही मी सहज योगाचे खुप काम केले आहे असं समजू लागला तर त्याने अजिबात ते सोडून द्यावे. ही अज्ञानाची आणखी एक खूण आहे. जर तुम्ही सागराचेचे कण न् कण आहांत तर तो सागरच सर्व काही करत असतो. तुम्ही काहींच करत नाही. स्वतःबद्दल अशी समजूत असणं म्हणजे स्वतःबद्दल आपण किती थोडं जाणतो असे आहे. तुम्ही एकदा सागर झाल्यावर आम्ही या किना-यापर्यंत गेला ,त्या किना-यापर्यंत गेलो असं कसे म्हणू शकाल? कारण हे म्हणायला "मी" कुठे आहे? हा "मी" पण जेव्हा संपतो तेव्हांच तुमच्यामधील सर्वव्यापी आत्मा प्रकाशति होतो.

काही लोक आपल्या देशाबरोबर किंवा आपल्या व्रताबद्दल पूर्णपणे वाहिलेले असतात. या प्रकारच्या चुकीच्या समर्पणाच्या कल्पना टाकून दिल्या पाहिजेत. लोकांवर हे संस्कार इतके बिंबवले गेले असतात की त्यांना हे अवघड वाटते. पण जोपर्यंत तुम्ही या संस्कारामध्ये गुंतलेले असतात तोपर्यंत तुम्ही तुमच्या मनाच्या पलीकडे जाऊ शकणार नाही. हे मनही एक कल्पना आहे.

आता हे संस्कार आपल्याबरोबर कसे असतात हे पहा. परदेशामध्ये गेलांत तर सगळे लोक श्रीगणेशांची भजणं म्हणतांना पहाल. श्री गणेशांची सगळी भजने त्यांना पाठ असतात. श्रीगणेशांचा फोटो, श्रीगणेशाबद्दल सर्व. आतां मी ऐकले की तिथली व्हायब्रेशन्स थांबली. श्रीगणेशांनी ही व्हायब्रेशन्स का थांबवली? माझ्या लक्षात आले की मीच म्हटले होते की श्रीगणेश ख्रिस्त म्हणून अवतरले. त्या लोकांवर ख्रिश्चन धर्माचे व ख्रिस्तांचे संस्का अगदी दृढ होते पण ते सूक्ष्म होते. आम्ही एका पौर्वात्य देशांत श्रीगणेशांची गाणी ऐकली आणि कल्पना करा की सारी व्हायब्रेशनस् थांबली.ते लोक श्री गणेशांची सगळी भजने गात होते पण सहजयोगाचे एक ही भजन नाही; गुरुचं तर सोडून द्या तर हा सुध्दा एक सूक्ष्म संस्कार असतो.

रशियामध्ये एक गृहस्थ होता, फार हुशार समजला जायचा. तो म्हणायचा आपण माताजींचा फोटो ठेऊ आणि icons ही ठेऊ दोन्हीमधून सारखीच व्हायब्रेशन्स येतील. हे शक्य नाही कारण (icons) हे एका कलाकाराची कल्पना आहे. त्यांचा मारिया किंवा ख्रिस्त किंवा इतर कुणाशींच संबंध नसतो. ते सव्र काल्पनिक आहे. इटालियन माणसानें ख्रिस्त बनवला तर तो इटालियन धर्तीचा बनेल; फ्रेंच माणसांने बनवला तर तो हाडकुळ्या फ्रेंच माणसासारखा असेल; हॉलंडच्या माणसाकडून बनविला तर त्याच्या कपाळाला विशिष्ट आकार असेल. सगळेजण आपाआपल्या कल्पनेप्रमाणे तो बनवणार. मारियाची पण तीच गोष्ट. तिचा हावभाव, फोटो सर्व शेवटीं एका कलाकाराच्या कल्पनेमधून येणार.

हे सारे कलाकार स्वतंत्र नसतात. त्यांची आपाआपली त-हा असते. rembrant ची एक त-हा, leomordo ची वेगळी त-हा. तो जन्मतःच साक्षात्कारी असला तरी त्याची एक पध्दत आहे. आज असे बनवेल उद्या तसे बनवेल असा कोणीच नसतो, तसं स्वातंत्र्य

नसते. ते आपाआपल्या पध्दतीप्रमाणेंच काम करतात. प्रत्येकाची स्वतःची अशी पध्दत असते आणि त्याच पध्दतीने त्यांच काम चालते. याचं कारण काय? तर त्यांनी प्रथम तीन चार प्रकार केले असतील पण लोकांना ते आवडले नाहीत. हे सुध्दां लोकांचे मत झाले. म्हणून शेवटी त्यांनी तीच एक पध्दत स्वीकारली व चालू ठेवली. आतां ख्रिस्तांचे पहा; तो जर जपानी लोकांनी बनवला तर त्याचे डोळे मिचमिचे असतील; चिनी लोकांनी केला तर त्याचं नाक नसणार, भारतीयाने बनवला तर काळया वर्णाचा असेल. मग त्यातून चैतन्यलहरी कशा येणार? म्हणून माझ्या फोटोबरोबर ते कशी तुलना करु शकतील? कॅमेरा आता वापरात आले, पूर्वी नव्हते. तसाच हा लाउड-स्पीकार पूर्वी नव्हता. तसेच विमानं पण त्या काळी नव्हती. मी आतां एकोणीस दिवस प्रवास करत आहे, एक दिवस विमानांत तर दुस-या दिवशी पब्लिक प्रोग्राम. तसं त्यांना शक्य नव्हते. कुणालाच ते शक्य नव्हते. श्रीकृष्ण सुध्दा त्यांना त्याकाळी प्रवास करण्यासाठी विमाने नव्हती. पण आजकाल प्रवास करणं शक्य झाले आहे कारण विमानांची सोय आहे. आतां व्हीडिओमुळे तुम्ही माझा फोटो बघू शकता. त्याकाळी हे कुठे होते? म्हणजे सत्य साधकांना मदत करण्यासाठी शास्त्रसुध्दा प्रगत झाली आहे. शास्त्रिय ज्ञानाचे आपल्यावर हे उपकारच आहेत. त्याकाळी मोटारीपण नव्हत्या. त्या नसत्या तर मी मिलान सुध्दा येऊ शकले नसते. मी जर बैलगाडीमधून प्रवास करत असते तर माझी काय अवस्था झाली असती? या सर्व सुविधा तुमच्यासाठी निर्माण केल्या गेल्या आहेत.

तुमचा जन्मच मुळी या विशेष गोष्टीसाठी या काळी झाला आहे. त्या काळीं तुम्ही नव्हता म्हणून साक्षत्कार देण्यासाठी कोणी लोक नव्हते. तुमच्यासारखे फारच थोडे लोक तेव्हा होते. तुम्ही स्वतःची शक्ती ओळखतां का याचाच मला प्रश्न पडतो. तुम्ही कोण आहांत हे तुम्ही अजून आळेखत नाही. संबंध वातारणांतच सध्या किती कार्य घडून आले आहे! शास्त्रसुध्दा तुमच्यासाठी विकसति झाले आहे. शास्त्र ही सुध्दा निसर्गाची एक देणगी आहे. हे सर्व तुमच्यासाठीच घडून आणले गेले जेणेकरुन तुम्ही शक्य तो थोड्या वेळांत या मानवी जीवनाची अत्त्युच्च स्थिती प्राप्त करुन घ्यावी. पण त्यासाठी खूप आत्मपरिक्षण करायला हवे. काय मिळवायचं याचा विचार करण्यापेक्षा तुम्ही आत्मपरिक्षण सतत करत रहा. या आत्मपरिक्षणाचा खूप उपयोग होईल आणि त्यांतून तुम्ही ख-या अर्थाने गुरु बनाल. तुम्ही खेड्यापाड्यांत गेलात त्या लोकांना तुमच्याकडे पाहूनच वाटेल की हा कोणी संत-पुरुष आहे. त्यासाठी तुमच्याजवळ कसले सर्टिफिकेट नको. तुमच्या साध्या सरळ वागणूकीवरून ते दिसुन येईल. मी प्रथम जेव्हां लेनिनग्राडला गेले तेव्हा मला कोणी ओळखत नव्हते; कसली जाहिरातही केली नव्हती. त्यांनी फक्त थोडी पत्रके लावली होती आणि प्रोग्रामला हॉलमध्ये दोन हजार माणसं जमली आणि आणखी दोन हजार बाहेर होती. हॉलमध्ये येण्याकरतां त्यांना पैसे लागले, ठीक आहे; हे काय चालले आहे असा मी विचार करत मी बाहेर आले आणि त्या बाहेरच्या माणसांना जागृति दिली, आणि सांगितले की उद्या परत या. पुन्हां दुस-या दिवशी आंत दोन हजार व बाहेर दोन हजार जमले, आणखी नंतर दोन हजार आले आणि मैदानातच बसून राहिले. मी आश्चर्यचकित झाले. मी त्यांना विचारउं की तुम्ही कस काय प्रोग्रामला आलात; ते म्हणाले उघड आहे माताजी; आम्ही फोटो पाहून आलो. आध्यात्माबद्दल एवढी आस्था! त्यांच्यामध्ये शास्त्रज्ञ होते. डॉक्टर होते आणि सर्व प्रकारचे बुध्दिवादी होते. त्यांना फोटावरुनच दैवी प्रकारचा अनुभव आला. त्या प्रकारची सर्जनशिलता आपल्याजवळ हवी, मग कसला तर्क लागत नाहीं की कांही नाही; जे आपल्याला पाहिजे ते हेच एवढंच कळते. कसला विचार नाही; वाद नाहीं, निवड नाही, यासाठी कोण सगळयांत योग्य आहे हे तुम्ही सांगू शकणार नाही. काहीं प्रथमच आलेल, काही नंतर आलेले किंवा कांही अजूनही येत असलेले. तरुण वा म्हतारे, बायका, पुरुष, मुले कुणीही असूं शकेल.

माझ्या हयातीमध्ये तुमच्यासारखे पूर्ण परिवर्तन

झालेले सुंदर दिसणारे अगदी चांगले आणि सगळं वातावरणच भारुन टाकणारे असे खूप लोक पाहू शकले तर मला त्याच्यासारखं दुसरं समाधान नाही. कधी कधी मला वाटते की आतां करण्यासारखे काही उरले नाही, सांर जमून आले. पण मग मला इकडे यायला सांगितले जाते. तिकडे बोलवतात म्हणून मी फिरत राहते. पण खरं तरं मी खुप समाधानी आहे. हे एकादा आम्रवृक्षासारखे आहे. आब्यांचे झाड एकदा लावले, ३-४ वर्षे त्यांची देखभाल केली की मग त्याच्याकडे काही बघावे लागत नाहीं; तुमची वाढ पण अशीच व्हायला हवी. तुम्ही स्वतःच स्वतःची प्रगति करायची आहे. कधी कधी तुम्हालाही कांही विचित्र लोक भेटतील, जे मूर्ख असतात, आक्रमक असतात, खरं तर सहजयोगी नसतातच असे वागतात पण मोठे सहजयोगी आहोत असं दाखवतात; पण त्यांच्याकडे नुसते पहात रहा.

आजच्या गुरुपूजेमध्ये गुरु कोणाला म्हणायचे याचा निश्चय करायचा आहे. पहिल्या प्रथम गुरुला कसलीही इच्छा नसते. अगदी कसल्याही प्रकारची नाहीं. याला "निरीच्छ " म्हणतात. भारतात एक अ- गुरु म्हणाला होता की माझ्याजवळ माताजींकडे आहे तशी शक्ती असली तर मी सा-या जगाचा सम्राट झाळो असतो". लोक म्हणाले " माताजी तसं का करत नाहींत? माताजी महाराज्ञी का होत नाहींत? कारण त्यांना कसलीच इच्छा नसते ". ज्या व्यक्तीला कसलीही इच्छा नसते त्याला काहीही बनण्यांत स्वारस्य नसते. मी म्हणाले की त्याला जाऊन सांगा की "तुला कसली इच्छा असेल तर तुला कसलीही शक्ती मिळणार नाही. त्यांना कसलीही इच्छा नाही म्हणूनच त्यांच्याजवळ शक्ती आहे". तुमच्या मनांत जेव्हा केव्हां इच्छा निर्माण होते तेव्हा आपल्यालाच म्हणा " छे, नको ", ते फक्त विसरुन जा. इच्छा जेव्हां मनावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करेल तेव्हां तुमचे चित्त तुम्ही दुसरीकडे वळवा. जसजसे तुम्ही निर्विचार अवस्थमध्ये स्थिरावता तसतसे तुमच्या इच्छा संपत जातात. जेंव्हा कधी आणीबाणीचा प्रसंग उद्‌भवतो तेंव्हा तुम्हाला निर्विचार अवस्थेत जाण्याची क्षमा मिळवली पाहिजे.

तुम्ही फक्त शांत रहाणे चांगले. तुमच्याच इच्छाकडे शांतपणे पहा इच्छेला सांगा,' मी पूर्णपणे समाधानी आहे. आतां मला कांही नको आतां दूर निघून जा'. अशा त-हेने तुम्ही निरीच्छ बनुं शकाल.

ही जी करुणा आहे त्या करुणेमधुनच शक्ति निर्माण होत राहते. छोट्या छोट्या गोष्टींमधुनही तुम्ही प्रेम व्यक्त करु शकता. वागण्याच्या लहान लहान पध्दतीमधूनही प्रेम व्यक्त होत असते. आज जगांत कशाची मुख्य आवश्यकता असेल तर ती प्रेम व शांतीची. तुम्ही शक्य असेल तेवढं प्रत्येकाला प्रेम व शांती वाटत रहा. सहजयोग्याला हे फार सोपं आहे. पण जे सहजयोगात नाहींत अशा लोकांबरोबरही तुम्ही आदराने व प्रेमाने वागत चला. फक्त त्यांच्याकडून आपल्याला काही मिळाले पाहिजे अशी इच्छा बाळगू नका, ठीक आहे, ते जसे आहेत तसे असुं दे. पुष्कळ सहजयोग्यांनी सहजयोगांत खूप मिळवलं आणि नंतर आपली साथ सोडून दिली हे तुम्हाला माहीत आहेच. कांही बिघडलं नाही. त्याला महत्व नाही; कारण त्यामध्ये त्यांचेच नुकसान होणार आहे. आपलं नाही; असल्या गोष्टीची फिकीर करायची मुळीच जरुर नाही.

आणखी एक गोष्ट म्हणजे तुमचे मन प्रतिक्रीया करणार नाहीं इकडे लक्ष द्या. काही लोकांना प्रतिक्रीया व्यक्त करण्याची संवयच असते. तुम्ही त्यांना काहीही सांगा, त्यांचे त्यावर लगेच उत्तर (मत) तयार ते कधीच काही मान्य करणार नाही. कुणी काही म्हटल्याबरोबर लगेच तुम्ही पण बोलू लागाल तर तुमच्या डोक्यात काय शिरणार? तुमच्या हृद्यांत काय जाणार? आणि तुमच्या चित्तांत काय शिरणार? प्रतिक्रिया करणे ही तुमची योग्य ती वाढ न झाल्याचे लक्षण आहे. आपलं चित्त नेहमी आपल्या मनांच्या वा शरीराच्या व्यापारांकडे आणि सगळीकडे जात राहते. पण ते त्यांच्या आंत शिरु शकत नाही. कारण जेव्हां जेव्हां ते तसे शिरायचा प्रयत्न करते तेव्हां तुम्ही क्रिया करुन त्याला थांबवतां.

नुसते पहायचे म्हणून तुम्ही कुठलीही वस्तू पहात नाही, तर त्याच्यावर प्रतिक्रया करतात. उदा.हे चांगले नाही, ते चांगले नाही, मी म्हटलं पाच वाजले तर लगेच म्हणतील, नाही पाच वाजून दोन मिनिटे, दोन सेकंद. हे सगळे खूपच कंडिशनिंग झाल्यामुळे होते. ते जायला पाहिजे. प्रतिक्रिया कशाला व्यक्त करायची? अशामुळे वाद-विवाद चालू होतात. त्यांतुन भांडणे मारामारी आणि शेवटी युध्द. तुम्ही मनाला जर बजावले की कांही नाही; तूं फक्त काल्पनिक आहेस आणि मी प्रतिक्रीयाच करणार नाही तर ९९. ९९ टक्के प्रश्न संपतील

आतां शेवटची पण सगळयांत जास्त महत्वाची गोष्ट अहंकार अहंकार असलेल्या संत माणसाला मी समजू शकत नाही. अहंकार असणे महणजे अगदी मूर्खपणा. एक प्रकारे तो वर्चस्व गाजविणाचा प्रकार आहे. कुणी काही म्हटले की तुम्ही लगेच रागावता. याचा अर्थ तुमच्याजवळ प्रेमाची व करुणेची शक्ति अजून कमी आहे. दुसरी माणसे जेव्हां चुकतात तेव्हां तुम्ही त्यांना सुधारलेच पाहिजे पण त्यासाठी ती शक्ति तुमच्यामध्ये असली पाहिजे. त्या माणसाला पण कळले पाहिजे की तुम्हाला त्यांच्याबद्दल प्रेम वाटले म्हणून तुम्ही त्याची चूक दाखवत आहांत, त्यांत तुमचा स्वार्थ नाही, किंवा काही फायदा नाही. हा अहंकार हा एक मोठी अडचण आहे, तो कुठल्या अज्ञानामुळे नव्हे तर तुमच्या स्वतःबद्दलच्या मूर्खपणाच्या समजुतीमुळे निर्माण होतो. तुम्ही स्वतःला फार मोठी व्यक्ति समजत असाल तर त्याला कोण काय करणार? अहंकारामुळे तुम्हाला अभिमान व गर्व चढतो आणि तुम्ही उध्दटपणाने वागता; पण जर तुम्ही नम्र झालतं, धंदेवाईक नम्रपणा नव्हे तर अंतर्यामी नम्र होणे, हृदयापासून त्या नम्रपणाचा आनंद घेऊ लागलात तर हा अहंकार पळून जातो. तुम्ही स्वतःलाच विचारा की आता कशाचा राग आला? मी पुन्हा त्यांच मुद्यावर येते. म्हणजे आत्मपरिक्षण तुम्ही इथे फक्त काही काम करण्याकरता नाही आलांत तर संत बनण्यासाठी तुम्ही इथे आला आहांत म्हणून हा अहंकार आतां तुमच्या आनंदाचा प्रेमाचा वर्षाव करणारे मशीनमध्ये परिवर्तित झाला पाहिजे. तुम्ही हे करु शकाल, ते मुळीचं अवघड नाही. अहंकार म्हणजे एक प्रकारची प्रतिक्रियाच असते. तुम्ही गोड बोलण्यांतून किंवा कठोरपणे दोन्ही त-हांनी प्रतिक्रीया व्यक्त करत असता. गोडपणातून नंतर विनोद निर्माण होईल. म्हणजे सुंदर फुले जशी उमलत असतात तसं तुमचे बोलणे असू दे. मग तुम्ही जे कांही कराल, तुमची प्रत्येक कृति मधुर होत जाईल. मी नम्र होईन, दयाळू होईन, गोड वागेन, क्षमाशील बनेन, प्रेमळ होईन याचा अहंकार बाळगायला शिका. म्हणजे अहंकार दुस-या बाजूने वापरा. म्हणजे तुम्ही सर्व जगाला कसे अंकित करु शकाल हे समजून चकित व्हाल.

आज या गुरुपूजेच्या दिवशी गुरु आपल्या शिष्यांना सुधारण्यासाठी उपदेश देत असतो. मी माझ्या नेहमीच्या हलक्या फुलक्या शब्दांत तुम्हाला जे सांगितले त्यांचं वाईट वाटून घेऊ नका. तुमचा धिःकार करण्याचा माझा मुळीच हेतू नाहीं पण आत्मपरिक्षणाचे महत्व पटवून द्यायला हवं होतं म्हणून सांगितले, कारण त्यातूंनच तुम्हीसुध्दा गुरुपदावर आरुढ होणार आहात. (माझे स्वप्न हेच आहे की, प्रेमधारांमध्ये चिंब झालेले, आपापसांत प्रेमाचा आनंद वाटणारे, एकमेकांच्या संगतीचा आनंद घेणारे व माणसा-माणसांचे संबंध सुधारणारे असे सर्व सहजयोगी मला सगळीकडे दिसावेत.) आपल्याकडे कांही प्रश्न व अडचणी आहेत. कांही विचित्र लोक आहेत हे सर्व मी जाणते. पण हे प्रश्न तुम्हीच सोडवायचे आहेत. एरवी तुम्ही जे सामर्थ्य मिळवले आहे त्याचा उपयोग काय? म्हणून तुमचे हे प्रश्न कसे सोडवायचे हे मी तुमच्यावरच सोपवते. आत्मपरिक्षण प्रेम व करुणा ( कंडिशनिंग न होता ) या मार्गातून तुम्ही ते साध्य कराल अशी खात्री आहे.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

# कुंडलिनी व सद्गुरू महिमा आणि श्रीकृष्ण शक्ति

श्री माताजींनी
दि. २५ सप्टेंबर १९७९ रोजी
हिंदुजा ऑडिटोरियम, मुंबई
येथे केलेल्या भाषणाच्या आधारे

मागील लेखामध्ये सांगितल्याप्रमाणे आपल्या शरीरात निरनिराळ्या देवतांची विशिष्ट स्थाने आहेत.

सदगुरूचे स्थान सुद्धा आपल्या शरीरात आहे. आणि हे स्थान आपल्या शरीरात आपल्या नाभीच्या सभोवार म्हणता येईल. नाभीचक्रावर मात्र श्री विष्णूशक्तीचे स्थान आहे, नि विष्णूशक्तीमुळेच मानवाची अॅमीबापासून उत्क्रांती झाली आहे व याच श्री विष्णूशक्तीमुळेच मानवाचे अतिमानवात घडण होणार आहे. सद्गुरूचे स्थान आपल्यामध्ये पूर्वीपासूनच स्थित आहे. आता गुरुतत्व कसे आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करू या.

गुरुतत्व अनादी आहे. आपल्यामध्ये अदृश्यरूपाने तीन मुख्य शक्त्या कार्यान्वित आहेत. यातील पहिल्या शक्तीस आपण श्री महाकालीची शक्ती, दुसरीस श्री महासरस्वतीची व तिसरीस श्री महालक्ष्मीची शक्ती असे संबोधू या.

यापैकी श्री महाकालीची शक्ती आहे. त्यामुळे स्थिती प्राप्त होते की, ज्यामुळे आपले अस्तित्व टिकून व बनून राहिले आहे. या विश्वाचे अस्तित्व सुद्धा श्री महाकाली शक्तीमुळे बनून राहिले आहे. आपणामध्ये ह्या शक्तीचे वहन 'इडा नाडीमुळे होत असते ही नाडी आपल्या शरीराच्या डाव्या बाजूस असते व आपल्या शरीरातील डावीकडील भागाचे चलनवलन ही नियमन करते, किंवा डाव्या 'सिम्पथेट नर्व्हस सिस्टिम' ला चालीत करते. ह्या नाडीमुळे आपणाला इच्छाशक्ती प्राप्त होते. इच्छेमुळे मनुष्य कार्यान्वित होतो.

कार्यशक्तीचा भाग आपणामध्ये उजवीकडे असून आपल्या सर्व उजवीकडील भागाचे चलनवलन किंवा उजव्या 'सिम्पथेटीक नर्व्हस सिस्टिम' ला चालीत करणारी शक्ती ही कार्यशक्ती म्हणता येईल व या शक्तीचे वहन किंवा नियमन पिंगला नाडीमुळे होत असते. ही आपल्या शरीरात उजव्या बाजूस असते व या शक्तीस श्री महासरस्वती शक्तीमुळे चालना मिळते.

आपल्यामध्ये कुंडलिनीशक्ती जागृत झाली की, आपण आपल्या दोन्ही (इडा आणि पिंगला) नाड्यांचे संतुलन जाणू शकता किंवा असंतुलन कुठे असू शकते याची जाणीव होऊ शकते व त्यानंतर सहजयोगातील काही फारच सोप्या प्रक्रियेमुळे आपण संतुलन आणू शकतो हे सांगण्याच तात्पर्य हे की, मानवाचे बहुतेक किंवहूना सर्वच्या सर्वत्रास (शारिरीक, मानसिक, बौद्धिक इत्यादी) वरील नमूद केलेल्या दोन नाड्यांमधील असंतुलनामुळे निर्माण होत असतात. म्हणूनच या दोन्ही नाड्यांमधे संतुलन असणे ही फार अत्यावश्यक गोष्ट म्हणता येईल.

वरील नमूद केलेल्या दोन शक्त्यांव्यतिरिक्त आपणामध्ये तिसरी शक्ती स्थित असते. ही शक्तीसुद्धा अतिशय महत्वपूर्ण आहे. कारण की, आज आपण ज्या मानवचेतनेच्या स्थितीस प्राप्त झालो आहोत, ते या शक्तीमुळेच या शक्तीस श्री महालक्ष्मी शक्ती म्हणतात. या शक्तीमुळेच अमीबापासून मानवाची उत्क्रांती झाली आहे.

या तिनही शक्ती जेव्हा बाल्यस्वरूपात एकत्रित होतात किंवा जिथे तिनही शक्तींचा समन्वय होतो, तेथे कुठल्याही प्रकारची घाण किंवा त्रास रहात नाही. उलट अशी गोष्ट नित्य टवटवीत असते आणि नवीनच वाटते. अशा वस्तुमधे कुठलाही अहंकार वगैरे नसतो. हेच ते सदगुरूत्व.

जसजसा मनुष्य मोठा होत जातो तसतशा त्याच्यामध्ये हळूहळू दोन ग्रंथी आणि दोन विशेष संस्था तयार होतात

त्यापैकी एकीला अंहकार व दुसरीस प्रतिअहंकार म्हणतात. इंग्रजी भाषेत त्यास अनुक्रमे 'इगो' व 'सुपर इगो' असे म्हणतात. या दोन्ही संस्था इच्छाशक्ती व क्रियाशक्तीमुळे घडतात. जेव्हा एखादा मनुष्य फार इच्छा करतो किंवा इच्छेनेच भारीत असतो, त्या वेळेस प्रतिअहंकार प्रस्थापित होतो. ही संस्था आपल्या डोक्यात उजवीकडे चालू होऊन डोक्याच्या मध्यभागी ती प्रस्थापित होते. दुसरी संस्था म्हणजेच अहंकाराची संस्था क्रिया शक्तीमुळे निर्माण होते ही संस्था कोणत्याही मनुष्यामध्ये की जो कोणतेही काम करतो त्यात प्रस्थापित होऊ शकते. मनुष्य त्यावेळेस असा विचार करतो की, मी अमुक काम केले 'मी रस्ते बांधण्याचे कार्य केले' ' मी धरण बांधले' 'मी घर बांधले' इत्यादी यामुळे मनुष्यांत एक प्रकारचे कर्तापण येते आणि त्यामुळे त्याच्यामधे अहंकाराची संस्था बळावते. ही संस्था आपल्या डोक्यात डाव्या बाजूकडे सुरू होऊन डोक्याच्या मध्यभागी येते. जेव्हा अहंकार व प्रतिअंहकाराच्या दोन्ही संस्था डोक्यात मधोमध येऊन भिडतात त्यावेळेस टाळू भरते. याला इंग्रजीत 'कॅल्सीफिकेशन' असे म्हणतात. सर्वसाधारणपणे मुलाची टाळू ३ ते ४ वर्षापर्यंत पूर्ण भरते. या वयापर्यंत मुले फार चांगल्याप्रकारे बोलवयास शिकलेली असतात व आपल्या मातृभाषेत बोलू शकतात.

सद्गुरूत्व हे श्री महाकाली, श्री महासरस्वती आणि श्री महालक्ष्मी या तीन शक्तींच्या समन्वयामुळे उद्भवले आहे. असे गुरूत्व आपणामधे परमेश्वराने फारच नूतन स्वरूपात स्थित केले आपणा सर्वांस सद्गुरू श्री दत्तात्रयाचा जन्म कसा झाला हे माहीतच आहे. श्री दत्तात्रयांमध्ये श्री ब्रम्ह, श्री विष्णू व श्री महेश या तीनही देवतांच्या पवित्रतेची शक्ति समन्वीत झाली आहे. ही शक्ति आपल्या नाभीच्या सभोवार ज्याला भवसागर म्हणतात त्यात समाविष्ट झालेली आहे. संपूर्ण विराट पुरुषाच्या मध्ये सुध्दा ही शक्ति समाविष्ट झाली आहे. ही शक्ति अनेक वेळा जन्म घेत असते. आदी कालापासुन पाहिले तर श्री आदीनाथ या शक्तिचेच अवतार होत. जैन संप्रदायात श्री आदीनाथजीना सद्गुरु मानून त्यांचे पूजन करतात, प्रार्थना करतात परंतु जैन लोकांना श्री आदीनाथजींच्या शक्तिबद्दल माहीत नाही. तीन शक्तीपासून निर्माण होणारी ही प्रथम शक्ती आहे. या शक्तीमधे धर्मांधता नाही. संन्याशाची जात नसते, असे आपण म्हणतो. याचा अर्थ हाच की, तो सर्व जाती व धर्म मानतो. जर कोणी व्यक्ती असे म्हणत असेल की, मी अमुक जातीचा गुरू किंवा अमुक धर्माचा गुरू आहे तर निश्चित असे समजावे की, ती व्यक्ती सद्गुरू नाही. सद्गुरूतत्वाची ओळखच ही आहे की, सर्वधर्माचे जे सार आहे किंवा सर्व धर्मांची नूतनता किंवा सर्व धर्माचे भोळे रूप आहे. ते त्या सद्गुरुत्यात सामावलेले आहे.

या जगात धर्माच्या नावावर कित्येक संस्था आहेत, तसेच अनेक व्यक्ती आहेत की, ज्या आपणास धर्मगुरु म्हणवून म्हणून घेताता त्यात सुध्दा काही राजकीय संस्था आहेत मग एका धर्मपंथीयाने दुसऱ्या धर्मपंथीयांना नावे ठेवायची, उदा. हिंदूंनी मुसलमानांना, मुसलमानांनी ख्रिश्चन लोकांना, ख्रिश्चननांनी मुसलमानांना; इ.इ. वास्तविक असे जे लोक आहेत, ते सर्वच दांभिक व अज्ञानी आहेत कारण की, अशा लोकांना सद्गुरुत्तव म्हणजे काय, याची कल्पनाच नाही किंवा कोण सद्गुरु आहेत किंवा कोण नाहीत हे त्यांना कळत नाही. आता सद्गुरु ओळखण्याची खुण काय, ते प्रथम पाहू या. सद्गुरु तुमच्या जवळील पैसे किंवा धन मागणार नाहीत उलट त्यास ते धुळीसमवेत लेखतील. सद्गुरुंना पैसे किंवा सोने, हिरे देऊन विकत घेऊ शकत नाही. सद्गुरुना असल्या गोष्टीची यत्किंचितही आसक्ती नसते. सद्गुरु हे आपल्या स्वतःच्या स्वभावात स्वच्छंदपणे वागत असतात. जर त्यांना वाटले तर ते इतरांशी बोलतील, नाहीतर नाही सद्गुरुपरमेश्वर प्राप्तीसाठी आपणाला विनवण्यासाठी आपल्या मागे मागे धावणार नाहीत हे सर्व मी आपली आई म्हणून आपणास सांगु शकते की, आपण प्रथम आपल्यातील सद्गुरुतत्वाला जाणा. मला कित्येक योगसाधना केलेले साधु व योगी भेटले. ही सर्व मंडळी फार मोठी आहेत त्यांना मी म्हटले की, आपण आता जंगलात किंवा डोंगरावर बसण्यापेक्षा समाजात येऊन लोकांना परमेश्वर प्राप्तीसाठी उद्युक्त करा. त्याचे सद्गुरुत्व जागृत करुन द्या. परंतु या महायोगी लोकांना समाजात यावयाचे नाही. ते म्हणतात की, समाजातील लोकांची अजून लायकी नाही की इतकी मोठी शक्ती त्यांना सहजगत्या द्यावी ! अशा महायोगी लोकांची स्थितीच निराळी आहे, अशा महान व्यक्तीसमवेत वागताना सुध्दा अतिशय विनम्र होऊन, सांभाळून बोलावे लागते, नाहीतर त्यांचे दंडुके किंवा चिमटे ते तुमच्या अंगावर मारु शकतात तेव्हा सद्गरुंच्या सभोवतालचे वातावरणच भिन्न प्रकारचे व पवित्र असल्यामुळे ते स्वभावातही कडक असतात व त्यांना कुठल्याही प्रकारचा धर्म सहन होत नाही. समाजामध्ये परमेश्वर प्राप्तीसाठी व त्यासाठी त्याला जागृत करण्यासाठी एखाद्या सद्गुरुरुपी आईच्या

कार्यपध्दतीत व महान योगी किंवा साधू यांच्या कार्य पध्दतीत फार फरक असतो. सद्गुरुरुपी आईच्या कार्य पध्दतीत दोन भाग आहेत. एक सद्गुरुतत्व व दुसरे म्हणजे मातृप्रेम. अशा मातेचे हृदय प्रेमशक्तीने, परमेश्वराच्या करुणेने तुडुंब भरुन वाहात असते व असे वाहणार प्रेम किंवा परमेश्वराची शक्ती इतरांना देण्यास ती आई उत्सुक असते. परंतु याबरोबर सद्गुरुतत्वाच्या सर्व गोष्टी कटाक्षाने पाळाव्या लागतात आणि त्यामुळे इतरांनी परमेश्वर प्राप्तीसाठी कोणत्या गोष्टी करावयास पाहिजेत व कोणत्या वर्ज्य कराव्या त्यावर निर्बंध येऊ पहातात. त्यासाठी साधकांमध्ये शिस्त असणे ही एक आवश्यक बाब आहे. आपणास या आधी सांगितले आहे की, सद्गुरुतत्व आपणामध्ये भवसागरात स्थित असते. आता आपणमध्ये हे सद्गुरुत्व कार्यान्वित कसे असते, हे समजले तर थोडेसं आश्चर्य वाटेल ! उदाहरणार्थ समजा आपण फार सात्विक विचाराचे आहात व आपण एखाद्या व्यक्तीच्या घरी जेवणासाठी गेलात. जर ती व्यक्ती दुष्ट प्रवृत्तीची असली, तर आपणास त्या व्यक्तीकडे जेवल्यावर फार त्रास होईल. अशा प्रकारचा त्रास निर्माण होण्यामागे अतिसूक्ष्म कारण जर आपण पाहिलेत तर लक्षात येईल की, दुष्ट प्रवृत्ती असलेल्या व्यक्तीकडे जेवल्यामुळे आपले सद्गुरुतत्व बिघडले व त्यामुळे आपणास त्रास झाला.

काही गोष्टी ज्या खाली स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत त्याबद्दल कुठल्याही प्रकारे वाईट वाटून घेऊ नये कारण की, मी ' आई ' असल्यामुळे सर्व स्पष्टपणे विशद करुन सांगत आहे आणि सर्वांनी ही गोष्ट विशेष समजून घ्यावी.

सद्गुरुतत्व आपल्या शरीरांमध्ये प्रामुख्याने यकृतामध्ये स्थित असते. सद्गुरुतत्वामुळे आपल्यामध्ये चेतनाशक्ती कार्यान्वित असते. जोपर्यंत आपले यकृत उत्तम प्रकारे कार्य करीत असते, तोपर्यंत आपल्यामधील चेतना ठीक असते. ज्यावेळेस आले यकृत खराब होते त्यावेळी आपली चेतना विचलीत होते. आपण पाहिले असेल की, ज्या माणसाची पित्तप्रकृती असते, त्याने तळलेली वस्तू खाल्ली तरी त्याला पित्ताचा त्रास होतो व त्याची चेतना विचलीत होते. आपले यकृत आपल्या चेतनेच शोषण करीत असते आणि त्यामुळे आपले यकृत उत्तम स्थितीत ठेवणे आवश्यक आहे. आता यकृत काय करते? यकृत आपल्या शरीरातील शरीरात पोषक नसलेल्या विषारी द्रव्याचे विश्लेषण करुन त्यांना वेगळे केले जाते. आणि त्या विषारी द्रव्याचे शरीराबाहेर विसर्जन करण्यास मदत करते. यकृताची बिघडण्याची क्रिया अतिशय मंद असते आणि त्यामुळे त्यात बिघाड असल्यास लवकर निदान होत नाही. अशा कित्येक वस्तू आहेत की, ज्यामुळे यकृत फार लवकर खराब होते. त्यामध्ये प्रथम म्हणजे दारु. आतापर्यंत संसारात जेवढया जेवढया सद्गुरुंचे अवतरणे झाले आहे, मग ते श्री. अब्राहाम असो, श्री मोझेस असो, श्री लाआत्से असोत किंवा श्री. सॉक्रॉटीस असोत सर्व ससद्गुरुनी एक गोष्ट प्रामुख्याने सांगितली आहे ती म्हणजे मंदिरापान. मानव धर्माच्या विरोधात आहे ह्याचे कारण असे की, आपल्या पोटामध्येच आपल्या दाही धर्माचे स्थान आहे मदिरापानामुळे आपल्या चेतनेवर आक्रमण होते. त्यामुळे दाही धर्मावर आक्रमण होते. जेव्हा मानवाची चेतनाच कमी होतो त्यावेळी तो चेतनेच्या विरोधात असतो. वाचकांनी हया गोष्टीची नोंद घ्यावी. त्याबाबतीत आमच्या सहजयोगातील एका शिष्याचा फार गाढ अभ्यास आहे आणि त्या निमित्त त्यांना लंडन युनिव्हर्सिटीने डॉक्टरेट पदवी दिली आहे ते मॉरिशियसचे रहिवासी आहेत आणि त्यांचे नाव आहे श्री. रेजीस्. मदिरापानामुळे मानवाची चेतना कमी होऊन मानव चेतनेच्या विरोधात कशा प्रकारे - ह्रास पावतो, हे सखोल अभ्यासानंतर सिध्द करुन दाखवले आहे.

मदिरेमुळे रक्तातील विषारी द्रव्याचे वर्गीकरण करु शकत नाही. किंबहुना जर ( विल्म ब्लेक - एक द्रष्टे, विल्यम ब्लेक या नावाचे एक फार मोठें द्रष्टे व कवि ( १७५७-१८२७ ) या काळात इंग्लंडमध्ये होऊन गेले. त्यांनी श्री माताजींच्या कार्याचे वर्णन आपल्या कवितांमधून अगदी स्पष्ट लिहून ठेवले आहे. कुंडलिनी जागृती, सामुहिक कुंडलिनी जागृती, आत्म्याचे प्रकाश श्री माताजींचे इंग्लंडमधील सुरुवातीचे व नंतरचे वास्तव्य त्या ठिकाणांची नावे इत्यादी सर्वांचे २०० वर्षापूर्वी स्पष्ट वर्णन केलेले असून तेथे होणा-या पुढील कार्याचे वर्णन सुध्दा करुन ठेवले आहे. विल्यम ब्लेक वाचताना सध्याच्या सहजयोगाच्या घटनांचे वर्णन स्पष्ट जाणवते. ) झालेच तर त्याचे यकृतात थर साचून यकृताच्या पेशीवर त्याचा परिणाम होतो. आपण असे पाहिले असेल की, ज्या माणसाने दारुचे प्राशन केले असेल त्या माणसाच्या शरीराचे तापमान वाढत नाही. कारण की, शरीरात निर्माण होणारी सर्व उष्णता यकृतात किंवा इतर अवयवात, साठून रहाते. पाण्यातील घटनेच्या बदलामुळे पाणी सुध्दा शरीरात निर्माण होणारी उष्णता शोषण करु शकत नाही. त्यामुळे शरीरातील एक एक अवयव

हळूहळू बिघडू लागतो. त्यात प्रथम यकृतावर जास्त परिणाम होतो. हयाचेच परिवर्तन पुढे कर्करोगासारख्या रोगामध्ये होते आणि कर्करोग सुध्दा हैड्रोजन व ऑक्सीजन यांच्या अणूंच्या अतिबदलामुळे होत असतो. एखाद्या कर्करोग झालेल्या व्यक्तीत न्याहाळले असल्यास असे आढळून येईल की, त्याच्या अंगावर निरनिराळे चट्टे पडलेले आढळून येतील किंवा त्याचा एखादा अवयव काळसर पडू लागेल, काही अवयव भाजून निघतील. परंतु त्या व्यक्तीचे तपमान नेहमीसारखे साधारण राहील. तेव्हा एक गोष्ट निर्विवाद आहे की, सद्‌गुरुतत्वासच्या विरोधात कुठलीही गोष्ट केल्यामुळे मग ते दारु पिणे असो किंवा इतर कुठलाही गोष्ट असो, त्यामुळे मनुशष्याची चेतना नष्ट पावून त्यात कर्करोगासारखे रोग होऊ शकतात

दारु पिण्यामुळे दुसरी एक गोष्ट मानवाच्या शरीरात घडते ती म्हणजे त्याच्या रक्तीवाहिन्या फुगतात व जाडया होतात. हया रक्त वाहिन्या जाडया होण्याचे कारण रक्तातील पाण्याच्या घटनेमध्ये होणारा बदल रक्तवाहिन्या जाडया झाल्यामुळे मनुष्यामधे अनेक प्रकारचे रोग होतात.

वास्तविक दारु म्हणजे पाश्चिमात्य देशात ज्याला ' वाईन ' म्हणतात ते पेय होय. आणि ' वाईन ' म्हणजे ताज्या द्राक्षांचा रस. मानवाच्या अतीपणामुळे त्यांनी द्राक्षांच्या रसाची कुजवण्याच्या प्रक्रियेने दारुत रुपान्तर केले. ही अशा प्रकारची दारु सर्वसाधारणपणे निरनिराळया वस्तूना पालीश करण्यासाठी वापरावयाची असते. उदा. जर हिरे पॉलीश करावयाचे असतील तर जीनने करावयाचे असतात. किंवा काही ठिकाणी स्पिरीट वापरतात. हे स्पिरीट पॉलीश म्हणून वापरण्याऐवजी जर शरीरात गेले, तर त्यामुळे रोग जडतात. मानवाच्या बुध्दीच्या विपरीत पणाची अशा वापरासाठी कल्पना करवत नाही. जी गोष्ट पॉलीश करण्यासाठी वापरतात, ती गोष्ट पिण्यात त्याला कुठला आनंद मिळतो ? दारु पिण्याने मानवाची चेतना नष्ट होते त्यामुळे तो स्वतःकडे अंतर्मुख होऊन पाहू शकत नाही किंवा स्वतःला तो समजू शकत नाही. त्यामुळे तो सत्यापासून पूर्णपणे परावृत्त होत असतो. 'सत्य' इतके भयानक नाही की ज्यामुळे मानवाने त्यापासून दूर रहावे?! उलट सत्य हे फार सुंदरण मनमोहक, शांतीदायक आणि सुखकारक आहे. परंतु मानवाला त्यांची कल्पना नाही आणि त्यामुळे मानवाला समजवण्यासाठी हया भूतलावर अनेक सद्‌गुरुनी जन्म घेतले. एक साधी सोपी गुरुकिल्ली म्हणजे मानवांनी आपले जीवन समतोल स्थितीत ठेवावे. मग ते व्यवहारिक जीवन असो किंवा वैवाहिक जीवन असो किंवा सामाजिक जीवन असो सर्वामध्ये समतोलपणा असणे आवश्यक आहे आणि हे अत्यंत नैसर्गिक आहे. आपण पाहिले असेल की सर्व साधारण मानव सहा फुटाच्या आसपास उंच असतो. तो कधी २०० फूट उंच नसतो. तसेच निसर्गातील इतर गोष्टीत समतोलत्व आपणास आढळून येईल. जो मनुष्य स्वतःला फार चढाओढीमध्ये प्रयत्नशील रहातो तो अखेरीस वेडयासारखा होतो. पाश्चिमात्य देशांत जेथे प्रत्येक क्षेत्रात चढाओढ आहे तिथले स्टॅटिस्टिक्स् पहाता असे लक्षात येईल की, तिथल्या ब-याचश्या मंडळीची स्थिती चढाओढीमुळे वेडसर झाली आहे. चढाओढीमुळे मनुष्यात असमाधान निर्माण होतो. त्यामुळे त्याची सर्वांगीण प्रगती होऊ शकत नाही. उलट त्याचा -हास होतो. तेव्हा मानवांनी समतोल जीवन जगून आपल्या शरीरातील सद्‌गुरुत्वाचे सद्‌गुरुचे स्थान बळकट करणे आवश्यक आहे आणि त्या नंतरच त्यामध्ये धर्माची स्थापना होऊ शकते. किंवहुना धर्माची धारणा त्यानंतरच होऊ शकते. अशा सात्विक जीवनामुळे मनुष्य स्वतःच्या धर्मात ओळखण्यात कारणीभूत होतो.

ज्या वेळेस मनुष्य स्वतःच्या दहाही धर्मापासून च्युत होतो त्या वेळेस त्याचा -हास होतो व तो असंतुलतेत ढकलला जातो. तेव्हा या दहाही धर्माचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. या दाही धर्माबद्दल 'बायबल ' मध्ये विशद रुपाने सांगितले आहे.

आपण समाजावर सुसंस्कार लादले नाहीत, तर आपली क्रियाशक्ती म्हणजेच पिंगला नाडी कार्यान्वित रहाणार नाही आणि आपल्या इडा नाडीवर भार येऊन प्रतिअहंकाराची संस्था आपल्या मेंदूमध्ये बळकाऊन बसेल. त्यामुळे मानव पूर्ण विभारीत होऊन जाईल. ह्या उलट जर मानवात अहंकाराची संस्था बळावली तर तो हिटलासारखा होऊन जाईल व त्यास असे वाटू लागेल की, मी फार मोठे कार्य करुन राहिलो आहे व कित्येक लोक मला हार घालतील, माझी आरती करतील इत्यादी. परंतु अशा माणसाच्या हे लक्षात येत नाही की, तो पूर्णपणे अहंकाराच्या संस्थेत विभारीत असल्यामुळे तो असंतुलतेत ढकलला गेलेला असतो आणि अशी व्यक्तीपूर्णपणे अहंकारी असते. ह्याचे वर्णन आपण श्री तुलसीदासजींनी लिहिलेल्या वाल्मिकी रामायणात श्री नारदमुनी अशा अहंकारामुळे कशा प्रकारे असंतुलतेत ढकलले गेले हे वाचू शकता. अशा अहंकारी व्यक्तींना असे वाटते की,

आम्ही फार यशस्वी आहोत. परंतु अशा व्यक्तीचे वैयक्तिक जीवन निहाळल्यास असे आढळून येईल की, अशी माणसे अत्यंत उग्र स्वभावाची अति हलक्या स्वभावाची किंवा अतिमूर्ख स्वभावी दिसतात. तेव्हा हे सर्व असंतुलीतपणामुळे होत असते व असंतुलीतपणा हा सद्‌गुरुतत्वाची रक्षा न केल्याने होत असतो. आता आपण असा प्रश्न कराल की, सद्‌गुरुतत्वाची रक्षा कशी करावी व ह्यासाठी काय करावे? प्रथम आपले गुरु कोण आहेत ते समजले पाहिजे. याबद्दलही आपल्या समाजात अनेक प्रकार पहावयास सापडतात. जर कोणी गुरु आपणास नाम घेण्यास प्रवृत्त करत असेल तर आपण निश्चित समजावे की, तो सद्‌गुरु नव्हे. परमेश्वराचे नाम समजून व ज्या प्रकारचा त्रास असेल तेथील देवतेचेच घ्यावयाचे असते, नुसते नाही किंवा सर्वासाठी एकाच देवतेचे नाम घेऊन चालत नाही उलट त्यांनी त्रास होतो. ह्याबद्दल असे म्हणता येईल की, आपणास ताप आला असल्यास डॉक्टरनी दिलेले एखादे औषध घेतो. पण तेच औषध दुसऱ्या रोगावर कसे लागू पडेल? उलट त्यांना त्रास नाही का होणार? हीच बाब निरनिराळ्या देवताच्या नामाबद्दल म्हणता येईल. जी व्यक्ती आत्मसाक्षात्कारी नाही ती सद्‌गुरु असू शकत नाही. आईकडे जी करुणा असते ती त्यांच्यामधे आढळत नाही. योगी लोकांनी फार मेहनत केलेली असते व त्यानंतर त्याचे अधिष्ठान जमते व परमेश्वरीशक्तीची अनुभूती मिळते. तेव्हा इतरेजनांनी सुध्दा कुंडलिनी शक्तीच्या जागृतीसाठी फार मेहनत घ्यावी असे त्यांना वाटते. जगात आत्तापर्यंत जितके सद्‌गुरु होऊन गेले त्यांनी सहजयोगाचाच मार्ग अवलंबिला होता. उदाहरणार्थ श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री तुकाराम महाराज, श्री नामदेव, श्री नानक, श्री कबीर इत्यादि अनेक सद्‌गुरुंनी समाजात राहून लोकांची सेवा केली व त्यांना धर्म शिकवण्याचा व योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळच्या लोकांनी या सर्वच्या सर्व सद्‌गुरुंचे न ऐकता त्यांच्यावर इतके अत्याचार केले आहेत, अनेक वेळा त्यांना मारले, त्यांना समाजातून वाळीत टाकले, त्यांना अन्नसुध्दा दिले नाही. आपणास हे सर्व माहितच आहे. आणि आता आपण पाहिलेत की, लोक त्या सर्वाच्या पालख्या घेऊन फिरतात, मिरवणुका काढतात, त्याच्या नावाने मोठमोठे समारंभ करतात, त्याच्याच नावाने पैसे कमवतात आणि त्यांच्या नावाने अन्नछत्र पण चालवतात. लोकांमधील अशा दांभिकपणाचे व खोटेपणाचे फार आश्चर्य वाटते. जेव्हा सद्‌गुरु प्रत्यक्ष जिवंत असताना त्यांच्याशी गैरवर्तन केले तर त्यांच्या मृत्यू नंतर त्यांचा उदो उदो का? हे सरासरी सद्‌गुरुतत्वाच्या विरोधात आहे. मानवाची बुध्दी इतकी स्वैर आहे की, परमेश्वरानेही त्याला संपूर्ण स्वातंत्र्य दिले आहे व आज ना उद्या त्यास त्या अद्‌भुत शक्तीचे ज्ञान व्हावे हीच त्या विराट परमेश्वराची इच्छा. आतापर्यंत सहजयोगामध्ये अनेक लोक फार सहजगत्या पार झाले. आता सहजयोग एका उंचीवर येऊन ठेपला आहे, ज्याला आपण 'महायोग' म्हटले पाहिजे. जोपर्यंत आपल्या कुंडलिनी शक्तीचे उत्थापन होऊन ती ब्रह्मरंध्राचे छेदन करीत नाही, तोपर्यंत योग झाला असे कसे म्हणता येईल? आत्तापर्यंत अनेक प्रकारचे जे योग वर्णिलेले आहेत ते म्हणजे 'योगा' ची पूर्वतयारी. परंतु सहजयोगात ज्यावेळेस आपल्या शरीरात कुंडलिनी शक्तीचे उत्थापन होते, त्यावेळेस हे सर्व योग आपणात आपोआप घटीत होतात व कुंडलिनी शक्ती सहस्त्रापर्यंत येते आणि ज्यावेळेस कुंडलिनी सहस्त्रात येऊन ब्रह्मरंध्राचे छेदन करते, त्यावेळेस 'महायोग' घटीत होतो. म्हणूनच सहजयोग, जो अनादी आहे जो आपल्याबरोबर जन्मास येतो आणि जो आपल्याबरोबर अनेक वर्षापासून चालत आला आहे, ज्यामुळे आज त्याची परिपुर्ती होत आहे, त्यास 'महायोग' मानले पाहिजे. आपण सर्वजण महायोग मिळविण्याच्या स्थितीत येऊन पोहोचलो आहोत. आता आपल्यामधील गुरुतत्व फलद्रुप होण्याची वेळ आली आहे. फार पूर्वी सद्‌गुरु एक किंवा फार तर दोन तीन शिष्य ठेवत असत. परंतु जोपर्यंत ही गोष्ट सर्वसामान्य माणसापर्यंत सर्व जनसमुदायापर्यंत पोहोचत नाही तो पर्यंत त्याला अर्थ नाही. आता हे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा समयच आलेला आहे. कारण की, आपल्यामधील अंतर्रचना हे ज्ञान मिळण्यास परिपूर्ण झाली आहे. फक्त आपले कनेक्शन मेनशी लागले म्हणजे झाले.

आपणातील सद्‌गुरुतत्वास नमस्कार करुन आपणातील श्री कृष्णशक्तीबद्दल आता मी सांगते.

मानवात सुरुवातीपासूनच श्रीकृष्णशक्ती स्थित आहे. ज्यावेळेस प्राणीमात्रापासून मानवाची उत्क्रांती झाली त्यावेळेस त्याची मान उंचावली गेली. हे कार्य मानवाच्या मानेमध्ये असलेल्या विशुध्दी चक्रामुळे झाले. या चक्रास १६ पाकळ्या आहेत. हे चक्र ज्या ठिकाणी स्थित आहे, त्या स्थानापासून आपली मान उंचावलेली आहे. हे कार्य विशुध्दी चक्रातील कृष्णशक्ती जागृत झाल्यामुळे शक्य झाले. ह्यामुळे आपल्या उत्क्रांतीस परिपूर्णता आली असे म्हणता येईल. उत्क्रांतीचा

इतिहास पाहिल्यास प्रथम एकपेशी अमीबा, त्यानंतर मासा, कासव असे होत होत मानव उत्क्रांतीच्या संध्याच्या स्थितीस पाहोचला आहे. श्रीकृष्णशक्ती ही संपूर्ण शक्ती आहे. ज्यावेळेस आपणामधील श्रीकृष्णशक्ती जागृत होते, त्यावेळेस आपला संबंध विराटाशी येतो, यामध्ये आपणास समष्टी दृष्टी येते. याचा अर्थ जर आपण माझ्याकडे किंवा माझ्या फोटोकडे दोन्ही हात फैलावून बसलात तर श्रीकृष्ण शक्ती जागृत होऊन आपण विराटाशी संबंधित होता व आपल्या हातामध्ये हे श्रीकृष्णाची विराटशक्ती जी सर्वत्र पसरली आहे, त्यामुळे चैतन्य जाऊ शकते. ज्यावेळेस आपल्या हातातून ही श्रीकृष्णशक्ती वाहू लागते, त्यावेळेस आपणामध्ये साक्षित्व येते. याचा अर्थ आपण सर्व गोष्टी एखाद्या नाटकाप्रमाणे पहाता वास्तविकपणे हे सर्व नाटकच आहे. श्रीकृष्णांनी त्यावेळी केलेल्या लीला किंवा प्रभुश्रीरामचंद्रांनी त्यावेळेस जे केले ते सर्व नाटकच होते. इतक्या बेमालूमपणे त्यांनी हे नाटक वटवले की, त्यात संपूर्णपणे समरस झाले होते. श्रीकृष्णानी अनेक लीला केल्या. ते पूर्णावतार होते. ज्यावेळेस मानवात सुध्दा पुर्णत्व येते त्यावेळेस तो विश्वाकडे नाटक पहावे त्या दृष्टीने पहातो व तो संपूर्ण साक्षित्वात उतरतो. त्यावेळेस तो भ्रमिष्ट नसतो किंवा दुःखी किंवा सुखी सुध्दा नसतो. तो आनंदात समरस झालेला असतो. हे श्रीकृष्ण शक्तीमुळे होते.

श्रीकृष्णशक्तीची खालीलप्रमाणे दोन अंगे आहेत. एक विशुध्दीचक्राच्या डावीकडील बाजूस व विशुध्दीचक्राच्या उजवीकडील बाजूस व एक मधोमध. यातील जी शक्ती मधोमध आहे ती विराटकडे घेऊन जाते. जी डावीकडील शक्ती आहे ती शक्ती मनुष्याच्या मनातील एकादी चूक किंवा चूकीचे किंवा खोटे कार्य केल्यानंतर निर्माण होणाऱ्या भावनांमुळे खराब होत असते. ज्यावेळेस एखाद्या माणसाला असे वाटते की, मी फार पाप केले आहे किंवा चूक केली आहे, त्या वेळेस त्याचे विशुध्दी चक्र डावीकडील बाजूस खराब होते. ह्यापैकी आपल्या येथे एक वस्तू फार प्रामुख्याने लोक वापरताना आपणास आढळते. ती म्हणजे सिगरेट, विडी व तंबाखू. सिगरेट, किंवा विडी ओढणे किंवा तंबाखू खाणे हे श्रीकृष्ण शक्तीच्या विरोधात आहे. परंतु आपणास आश्चर्य वाटेल की, ज्या लोकांना अशा सवयी पूर्वी होत्या त्याच्या सवयी सहजयोगात आल्यानंतर पार झाल्यानंतरआपोआप सुटल्या.

परमेश्वराने तंबाखू जंतुनाशक म्हणून बनविला. परंतु माणसाची बुध्दी विक्षिप्त असल्यामुळे तो त्याच तंबाखूचा विपरीत वापर करतो. याच तंबाखुमुळे श्रीकृष्णशक्तीला तर बाधा येतेच पण सद्गुरुतत्वसुध्दा बिघडते. कारण की, खाल्लेली तंबाखु पोटात जाणे व तेथुन यकृत इत्यादी अवयवांना खराब करणे व त्यामुळे सद्गुरुतत्व खराब होते. सद्गुरुतत्व आपल्या नाभी सभोवार पसरलेले असल्यामुळे सर्वच्या सर्व त्रास एकदम एखाद्या आपत्तीप्रमाणे येऊन कोसळतात.

विशुध्दी चक्रावरील डाव्या बाजूस श्री विष्णुमायेची शक्ती स्थित आहे. ही शक्ती बहिर्णाची आहे. श्रीकृष्णाच्या बहिणीची. श्रीकृष्णाची बहीण जी मारली असता आकाशात उडून गेली व जिने आकाशवाणी केली होती तीच ही श्रीविष्णुमायाशक्ती ज्या माणसाची बहीण फार आजारी असते त्याचे डावीकडील विशुध्दी चक्रावर त्यास बोजा जाणवेल. जर एखाद्या माणसाची दृष्टी आपल्या बहिणीप्रती किंवा इतर महिलाप्रती योग्य किंवा पवित्र नसल्यास हे चक्र लगेच बिघडते. आजकालच्या समाजात अनेकांचे हे चक्र खराब असल्याचे आढळते. कारण की, त्यांची दृष्टी पवित्र नसते आपल्या पुरातन शास्त्रात सांगितल्याप्रमाणे आपल्या पत्नीशिवाय इतर सर्व महिलांना बहिणीप्रमाणेच वागवले पाहिजे. असे आपण वागून पहा की, लगेच आपणास संतोष, शांती व पावित्र्य लाभेल, असे वागल्याने आपले कित्येक त्रास नाहीसे होतील. अपवित्र वागणुकीमुळे विशुध्दी चक्राच्या डावीकडील भागावर त्रास येतो. त्या सध्या सिनेमावाल्यांमुळे लोकांवर फार परिणाम होतो या सर्वजणांना आपल्या केलेल्या अशा अपवित्र कर्माची फळे भोगावी लागणार. सध्याच्या मंडळीमध्ये भोळेपणा नाही किंवा तेजस्विता दिसत नाही कित्येकांचे डोळे गरगर फिरत असतात. हे डोळे फिरवणे म्हणजे सुध्दा श्रीकृष्णशक्तीच्या विरोधात कार्य. डोळे फिरवण्याने आपल्याला आनंद तर नाहीच मिळत, पण आपल्या डावीकडील संस्थेत भुतांचे आगमन होत असते आणि त्यामुळे डावीकडे विशुध्दी चक्रावर पकड येते. त्यानंतर मग असे वाटते की, मी अमुक गोष्ट करावयास नको होती इत्यादी आमच्या लहानपणी आम्हाला आई-वडील सांगत असत की, खाली मान घालून नजर जमिनीवर ठेवून चाला. आपणास कदाचित माहीत असेल की, श्री लक्ष्मणांनी श्री सीतामाईचे पायच पाहिले आहेत. त्यावर कधी त्यांनी नजर उचलली नव्हती. यात त्यांचा काही वाईट उद्देश नव्हता ही एक शिस्त होती, की नजर जमिनीवर ठेवून चालणे. जी मंडळी नजर खाली करुन चालतात ती बादशाही वृत्तीची असतात. जे

भिकारी किंवा घाणेरडे असतात ते आपली नजर सारखी फिरवीत असतात हा डोळे फिरवण्याचा रोग आज इतका पसरला आहे की, त्यामुळे डोळ्यांचे रोग पसरत आहेत. लोकांची नजर कमजोर होते. त्यावेळेस मग हिरवळीवर चालण्यास सांगण्यात येते. अनवाणी पृथ्वीमातेवर चालण्यास सांगण्यात येते, कारण की, ती (पृथ्वीमाता) आपली आई आहे. एकदा आई काय आहे हे समजल्यावर लोक, बहिण काय आहे हे समजू शकतील. तात्पर्य आपण आपली नजर खाली ठेवून चालणे आवश्यक आहे व कोणाकडेही अपवित्र दृष्टीने पाहू नये. हीच गोष्ट आपल्याकडील अनेक सद्गुरुंनी सांगितली आहे. श्री येशूख्रिस्तांनी सांगितले आहे की, तुमची नजर व्यभिचारी नसावी, खास करुन आमच्या कडील मध्यमवर्गीयातील लोकांनी ह्या गोष्टी फार समजणे आवश्यक आहे, कारण की ज्यांच्याजवळ पुष्कळ पैसा आहे, त्यांच्या डोक्यात वरील गोष्टी सहजगत्या शिरणार नाहीत; कारण की, ते त्यांच्या पैशाच्या मस्तीत चूर असतील, त्यांना पाप-पुण्याचा विचार करण्यात वेळ नाही. माणसाला पापुण्याचा विचार विशुध्दी चक्रामुळे येतो जर पाप-पुण्याचा विचार नसेल तर आपली कुंडलिनी जागृत होणार नाही. विश्वात पाप पुण्य दोन्ही गोष्टी आहेत. ज्यावेळेस आपण सहजयोगात येऊन पार होता त्यावेळी आपणात श्रीकृष्णशक्ती जागृत होऊन व आपण प्रतिष्ठीत होता. आपण मुळात प्रतिष्ठीत आहातच, पण पार होण्यापूर्वी आपणास त्याची जाणीव नसते. आपणास माहीत नाही की परमेश्वराने किती परिश्रमाने एकएक चक्र आपल्यामध्ये बनविले आहे. आपण हे सर्व शास्त्र जाणून घ्या आणि स्वतःचे महत्व समजून घ्या व आपली स्थिती जाणून घ्या. आपण साऱ्या विश्वातली फुले आहात. आता फळात रुपांतर होण्याची वेळ आली आहे. आपण हे समजून घ्या की, आपण परमेश्वराचे अंश आहोत. परमेश्वर आपल्याला मान देत आहे आणि आपणसमोर नतमस्तक होत आहे आणि आपणास विनवित आहे की, आपण हे सर्व ज्ञान मिळवून घ्या व स्वतःचा अर्थ लावून घ्या. आपल्या 'स्व' ला जाणण्यानेच मनुष्य आपली सुबुध्दी मिळवितो. जोपर्यंत माणसात दुर्बुध्दी असते, तोपर्यंत त्याची जागृती होत नाही. सुबुध्दी विशुध्दी चक्रामुळे जागृत होते. ज्यावेळेस मनुष्य आपल्या विशुध्दीचक्रात जागृत होतो, त्यावेळेस त्याला सुबुध्दी येते व त्याच्यामध्ये संतुलन येते. एक असते सुबुध्दी व दुसरी दुर्बुध्दी. बुध्दी गाढवासारखीसुध्दा होऊ शकते किंवा मूर्खासारखी. बुध्दीमुळे तर्कज्ञान व त्यामुळे एखादा मनुष्य चोरीसुध्दा करु शकतो. तो म्हणेल मी चोरी का करु नये? माझ्याजवळ अमुक गोष्ट नाही त्याच्याजवळ आहे. तर मी चोरी करणार! ह्याला कारण तर्कबुध्दी आता असे पहा की, तर्कबुध्दीमुळे मनुष्य प्रत्येकवस्तुकडे आपण संयुक्तिक विचाराने पहावयास लागतो परंतु सुबुध्दीमुळे तसे होत नाही. सुबुध्दीमुळे आपली व दुसऱ्याची वस्तू ही त्याची स्वतःची आहे हे लक्षात येईल. आणि माझ्या वस्तुत जो आनंद आहे, तो इतरांच्या वस्तूमध्ये नाही वास्तविक कोणतीच गोष्ट कोणाची नाही. आपण सर्वजण सर्वच्या सर्व येथे सोडून जातो हा तर सर्व जमाखर्च आहे, की ही माझी वस्तू व ती त्याची. एक फारच सर्वसाधारण बाब आहे की, सर्व गोष्टी येथेच सोडून मनुष्याला जावयाचे आहे मग त्याच्यामागे एवढी धावपळ कसली?

आता उजवीकडील विशुध्दी चक्राबाबत पाहूया. हे श्रीकृष्ण आणि राधा यांच्या शक्तीपासून बनलेले आहे. ह्या शक्तीच्या विरोधात ज्यावेळेस मनुष्य जातो त्यावेळेस त्याची वृत्ती अशा प्रकारची असते की जेव्हा तो म्हणेल की, मी फार मोठा आहे, मी राजा आहे, मी फार मोठा पुढारी आहे आणि मीच सर्व आहे. अशा वृत्तीमुळे त्या माणसात अहंकार बळावतो. आपणास माहीतच आहे की, कंसाने आपल्या सख्ख्या बहिणीस व बहीणीच्या मुलांना कशा प्रकारे मारले, त्याल असे वाटत होते की, कोणत्या तरी प्रकारे मी सर्वांवर हक्क गाजविले पाहिजेत! त्याला जगातील इतर कुठली गोष्ट दिसत नाही त्याला उजवीकडील विशुध्दी चक्राची पकड असते. परंतु आपणामध्ये सर्वात प्रथम सर्दीमुळे उजव्या विशुध्दीवर पकड येते.

आता विशुध्दी चक्राच्या मधोमध जी शक्ती आहे ती विराटाची शक्ती आहे. या शक्तीमुळे मानव परमेश्वराच्या शोधात असतो जर मी विराट परमेश्वराचा एक भाग असलो तर परमेश्वराला शोधण्याचा अर्थ काय? ह्याचाच अर्थ जोपर्यंत आपणामध्ये सामूहिक चेतना येत नाही, तोपर्यंत आपणास त्यांचे उत्तर मिळणार नाही. नुसते लोकांना भाऊ-बहीण मानून सामुहिकता मिळणार नाही. पण हे सामुहिक चेतनेत आपोआप घटीत होते. जोपर्यंत आपणहि सहजयोगात येऊन आपली कुंडलिनी शक्ती जागृत होत नाही, तोपर्यंत आपली सामुहीक चेतना जागृत होत नाही. एकदा आपली कुंडलिनी शक्ती जागृत होऊन आपण पार झालात की, आपण इतरांच्यातील भावना, जाणीवा इ. स्वतःमध्ये जाणू शकतो. हे आपल्यातील सामुहिक चेतना जागृत झाल्यामुळे शक्य होते. आपण स्वतःकडे अंतर्मुख होऊन पाहू शकतो व आपली दृष्टी (absolute) पूर्णतिकडे

बळते. इतर गोष्टीकडे आपण पूर्णते (absolute) च्या तुलनेने वाहू लागतो. आपली आंतरिक स्थिती काय आहे हे तंतोतंत जाणू शकता. आता सोप्या भाषेत सांगायचे तर आपल्या हाताची पाच बोटे, त्यावर आपण आपल्या शरीरातील पाच चक्राची जाणीव घेऊ शकता. तसेच इतरदोन चक्रांची जाणीव सुध्दा आपण आपल्या तळहातावर घेऊ शकता. डाव्या हातावर डाव्या ईडा नाडीमधल्या चक्रांचे; तर उजव्या हातावर उजव्या पिंगला नाडीमधल्या चक्रांची जाणीव होते. अशा प्रकारची जाणीव फक्त कुंडलिनी जागृती होऊन पार झाल्यानंतरच होते. ज्यावेळेस मनुष्य पार होतो त्यावेळी त्याच्या मज्जारज्जुतील सात चक्रे जागृत होतात. त्यांची जाणीव दोन्ही हातांवर होते तसेच त्या स्थितीत त्यास सामुहिक चेतना प्राप्त होते.

वरील गोष्टी आपल्या विशुध्दीचक्राशी संबधीत आहेत. आमच्याकडे सहजयोगात बरीचशी मंडळी येतात व पार होतात. पण ह्यापैकी कित्येकांना चैतन्यलहरींची जाणीव होऊ शकत नाही. ह्याचे कारण त्यांच्या विशुध्दी चक्रावर असलेला त्रास हे हाय. याआधी विशुध्दीचक्र सिगरेट किंवा विडी इ. ओढण्याने खराब होते हे सांगितलेच आहे. शहरातील वातावरणात अशुध्दता जास्त असल्यामुळे सिगरेट किंवा विडी न ओढतासुध्दा हे चक्र खराब होऊ शकते विशुध्दी चक्र खराब झाल्यामुळे या चक्रामधून मेंदुकडे दुतर्फा संवेदना वाहून नेणाऱ्या नाडया बिघडतात व त्यामुळे अशा माणसाची संवेदन क्षमता कमी होते. परंतु जसजसे विशुध्दी चक्र जागृत होत जाते तसतशी संवेदन क्षमता वृध्दिगत होते. विशुध्दीचक्र जागृत करण्यासाठी सुध्दा काही मंत्र आहेत आपणास आश्चर्य वाटेल की, विशुध्दीचक्र स्वच्छ करण्यासाठी किंवा जागृत करण्यासाठी आपल्या अनामिकेची बोटं दोन्ही कानात घालून मान मागे करुन व नजर आकाशाकडे करुन मोठयाने व आदराने 'अल्ला-हो-अकबर' हा मंत्र बोलण्याने, विशुध्दीचक्र स्वच्छ होते. तेव्हा आपण समजले पाहिजे की, 'अकबर' म्हणजे विराट पुरुष परमेश्वर होय श्रीगुरुनानक साहेबांनी सुध्दा विराट परमेश्वराच्या अर्थात श्रीकृष्णाबद्दल गोष्टी त्यावेळी लोकांना सांगितल्या. परंतु अशी किती माणसे आहेत की, त्यांनी सांगितलेल्या गोष्टींचे लोकांनी अनुकरण केले आहे? उदा त्यांनी सांगितले होते की, दोन्ही हात नमाज पडतात, त्याप्रमाणे पसरवून परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे व अशा प्रकारे हात पसरवून नमाज केल्याने कुंडलिनी शक्तीचे जागरण होते. परंतु ही गोष्ट अनेक लोकांना माहीत नाही. श्रीगुरुनानक साक्षात श्रीदत्तात्रयांचे अवतार होते आणि कुंडलिनी जागृतीबाबत जितके कार्य त्यांनी केले आहे, तितके पूर्वी कोणी केले नाही. सैतानाचा निकाल कसा केला पाहिजे इ. बद्दल अनेक बारीक व अभिनव गोष्टी त्यांनी सांगितल्या आहेत ज्यांचा वापर सहजयोगांमध्ये बऱ्याच प्रमाणात आम्ही करतो. श्री आदि शंकराचार्यांनी तर अनेक सुक्ष्म गोष्टी लिहून ठेवल्या आहेत ह्या सुक्ष्म गोष्टी आपण काटेकोरपणे आपल्या जीवनात अंगिकारल्यावर आपण सहजयोगात पूर्णपणे विरघळून जाऊ. आपल्या देशावर साधुसंतांनी अवतार घेऊन अशा ज्ञानांचा उलगडा करुन समाजात जागृती करुन आपणावर अनेक उपकार केले आहेत. विशेष करुन आपल्या महाराष्ट्रात साधुसंतांनी अवतार घेऊन ह्या भूमीला पावन केले आहे ह्या संतांची इतकी तपश्चर्या आहे की, त्यांच्या नुसत्या इशाऱ्यावर लोक पार होत असतात मी जेव्हा सहजयोगाच्या प्रचारार्थ निरनिराळया खेडोपाडी जाते, त्यावेळी हजारो लोक येत असतात. परंतु शहरातील लोकांना येण्यास सवड नसते. कारण की, खेडोपाडयाच्या लोकांना सत्याची ओळख आहे आणि अशीच माणसे सहज योगात प्रतिष्ठीत होतील. इथे येण्यागबाळ्याचे काम नव्हे. ज्या लोकांना स्वतःबद्दल आदर नाही, श्रध्दा नाही किंवा सत्याची आसक्ती नाही. त्यांच्यासाठी सहजयोग नाही. सहजयोग मिळवण्यासाठी फार मोठे पंडीत किंवा विद्वान असण्याची जरुर नाही. सहजयोग हा सर्वसाधारण मध्यम परिस्थितीतील माणसांसाठी आहे त्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असावयास हवी असे नाही, परंतु माणसे हृदयाची भक्कम असावयास हवी. किंवहुना राजेशाही स्वभावाची असावी अशा प्रकारची माणसे सहजयोगात प्रतिष्ठीत होतात.

श्रीकृष्णशक्तीबद्दल लिहिण्यास अनेक गोष्टी आहेत परंतु अतिशय शौर्यात इथे मांडण्यात आल्या आहेत आपण सहयोगात आल्यावर पार झाल्यानंतर कुंडलिनी म्हणजे काय हे जाणू शकता व तिचे स्पंदन आपण आपल्या नजरेने पाहू शकता. जोपर्यंत आपण 'पार' होत नाही, तोपर्यंत आपण ह्या सर्व ज्ञानाबद्दल अनभिज्ञ असावा. परंतु आपण 'पार' झाल्यावर ह्या ज्ञानाचा प्रकाश आपणमध्ये येतो व सर्व व्यापी परमेश्वराशी चैतन्यलहरींव्दारे संवाद करु शकता कारण की, ही परमेश्वरी शक्ती सर्व अणुरेणूत संचारलेली आहे.

आपल्या सर्वांना अनंत आशिर्वाद !

# श्री कुंडलिनी शक्ती आणि श्री येशू ख्रिस्त

आज श्री कलकी देवता व श्री कुंडलिनी शक्ती यांचा काय संबंध आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ' कल्की ' शब्द निष्कलंक ह्या शब्दापासुन निर्मित झाला आहे. निष्कलंक म्हणजे ज्यांवर कलंक किंवा डाग नाही असे, म्हणजेच अत्यंत शुध्द.

श्री कल्की पुरणांत श्रीकल्की अवताराबद्दल बरेचसे लिहीलेले आहे. त्यात असे या भूतलावर संभालपूर या गांवी एका पांढ-या शुभ्र घोड्यावरुन होईल. 'संभाल' शब्दामधील 'भाल' शब्द म्हणजे कपाळ आणि संभाल म्हणजेच ह्या भाळप्रदेशी स्थित म्हणजेच आपल्या कपाळावर स्थित. अर्थात् श्री कल्कीशक्तीचे स्थान आपणामध्ये कपाळावर असते. या शक्तीला श्री महाविष्णूची विनाशशक्ती सुध्दा म्हणतात.

श्री येशुख्रिस्ताचे अवतरण व श्री कलकीशक्तीचे अवतरण या मधील कालावधीत मानवाला स्वतःचे परीवर्तन करुन परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करण्याची संधी मिळेल. याबाच बायबल या ग्रंथात 'अखेरचा न्याय' किंवा निवाडा म्हणजेच (The last Judgement) असे म्हटले आहे. या भूतलावरील प्रत्येक माणसाबाबत हा अखेरचा निर्णय होणार आहे. कोण परमेश्वराच्या राज्यात प्रवेशण्यासाठी योग्य आहे व कोण नाही याचा निवाडा होण्याची वेळ आता आली आहे.

सहजयोगामुळे सर्वांच्या बाबतीत अखेरचा निवाडा होणार आहे. कदाचित् ब-याचशा लोकांना वरील गोष्ट अद्भुत वाटेल. परंतु हे अद्वितीय असुन सत्य आहे. आईच्या प्रेमामुळे एखादी व्यक्ति सहजच, विनासायास पार (आत्मसाक्षात्कारी) होते आणि त्यामुळेच अखेरीच्या निवड्याबद्दल वर नमूद केलेली वरील गोष्ट इतकी सुंदर नाजूक व सुक्ष्म बनविली गेली आहे, कि त्यांत कुणालाही विचलीत होण्याचे कारण नाही. मी आपणास सांगू इच्छिते कि सहजयोगामुळेच आपला अखेरीचा निर्णय होणार आहे, आपण परमेश्वराच्या साम्राज्यात प्रवेश करण्यास लायक आहांत कि नाही त्याचा निर्णय सहजयोगाव्दारे लागणार आहे.

बरीचशी मंडळी निरनिराळया चित्तप्रवृत्तिने सहजयोगाकडे वळतात. समाजातील कांही मंडळी फार तामसी वृत्तीची किंवा जटप्रवृत्तिची किंवा सुस्त असतात. ही मंडळी इडा नाडीवर कार्यान्वित असतात. यातील काही मंडळी अतिशयोक्तिमुळे मदीरापान किंवा तत्सम पेय घ्यावयास लागतात व त्यामुळे अशी माणसे सत्यापासून दुरावली जातात. दुस-या प्रकारची काही मंडळी पिंगला नाडीवर कार्यान्वित असताता व फारच महत्वाकांक्षी असतात. त्यांना इतके स्वतंत्र व्हावयाच असते व त्यांच्या अपेक्षा इतक्या विशेष धराच्या असतात की त्यामुळे त्यांची दुसरी बाजू (इडानाडी) संपूर्णपणे लंगडी पडते. त्यामुळे त्यांना अनेक दुर्धर रोग होऊ शकतात त्यांना परमेश्वराशी संबंधित रहावेसे वाटत नाही. वरील दोन्ही प्रकारची माणसे आपणास समाजात पहावयास सापडतील. लोक एकतर फारच तामसी वृत्तीत तरी राहातील किंवा फार राजसी वृत्तीत राहतील. यातील पहिल्या प्रकारची माणसे दारु म्हणजे दारुच प्यायची म्हणजे स्वतःच्या जागृत स्थितीपासुन, सत्यापासुन परावृत्त रहायचे दुस-या प्रकारची माणसे जे काहीही सुदंर किंवा सत्य असेल ते सर्व नाकारायचे असे राजसी लोक नेहमी सर्व गोष्ट नाकारत असतात. अशी माणस अहंकाराने भरलेली असतात. त्याच प्रकारे प्रति अहंकाराने अतिशय भरलेली सुस्त, जड, व बंडखोर प्रवृत्तिची माणसे आढळतात. जी मंडळी फार महत्वाकांक्षी असतात ती आपापसांतील चढाओढी मुळे स्वतःचं हासं करुन घेत असतात. वरील दोन्ही प्रकारची माणसे एकतर फार महत्वाकांक्षी म्हणजे अहंकाराने भरलेली व दुसरी अती सुस्त व प्रतिअहंकाराने भरलेली सहजयोगात फार मोठया मुश्कीलीने येऊ शकतात. परंतु जी मंडळी सात्विक आहेत. जी मध्यम वृत्तिची आहेत अशी माणसं सहजयोगात लवकर येऊ शकतात. तसेच जी माणसं फार साधी आहेत ती सहजयोगास विनासायास व लवकर प्राप्त होतात व ती पारही सहजच होतात. उदाहरणार्थ आपण पाहीलत तर सहजयोगासाठी शहरातील काही ठरावीक मंडळी येतील पण तेच खेडोपाडी आम्ही गेलो तर ५ ते ६ हजार माणसं येतात आणि विशेष म्हणजे अशा सर्वच्या सर्व मंडळींना आत्मसाक्षात्काराची अनुभूती मिळते. याला कारण शहरातील माणसं बाजवीपेक्षा जास्त कार्यमग्न असतात. ती इतर कामात जास्त प्रमाणात गुंतलेली असतात. त्यांना असं वाटत की परमेश्वराचा शोध करण्यापेक्षा इतर कामे फार महत्वाची आहेत. परमेश्वराचा शोध करण्यासाठी शहरातील मंडळीना वेळ नाही. त्यांना असं वाटतं की ह्या गोष्टी वृथा आहेत तेव्हा त्यासाठी वेळ का दवडा? या संदर्भात मला आपणास आवर्जून सांगायचं आहे की सहजयोगच आपणास योग्य दिशेस घेऊन जाऊ शकतो व परमेश्वरीज्ञान समूळ उघड करुन सांगतो. सर्व परमेश्वराच्या शोधकांना अतिशय सहजतेने परमेश्वरीज्ञान खुले केले जात आहे. हे सर्व उत्स्फुर्तपणे होतें. आपणाला आपला

साक्षात्कार विनासायास, काहीही कष्ट न घेता मिळतो. यासाठी आपणास काहीही द्यावे लागत नाही किंवा काहीही कष्टप्रद हालचाली किंवा आसने सुध्दा करायची आवश्यकता नाही.

परंतु एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे, ती म्हणजे साक्षात्कार मिळाल्यानंतर परमेश्वराच्या राज्यांत प्रस्तापित होईपर्यंत मध्यतरी अनेक अडथळे आहेत व श्री.कलकीशक्तीचा संबंध या मध्यंतरीच्या काळाशी संलग्न आहे. आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर सुध्दा जी मंडळी आपल्या पूर्वीच्या प्रवृत्तीत अडकतात किंवा मग्न असतात त्यांच्या स्थितीस 'योगभ्रष्ट' स्थिती म्हणतात उदाहरणार्थ एखादी व्यक्ति पार झाल्यावर सुध्दा जर अहंकारवृत्तीच्या कामात मग्न असेल किंवा पैसे कमविण्याच्याकार्यातच अतिशय मग्न असेल किंवा आपलं वर्चस्व प्रस्थापित करण्यास अती मग्न असेल तर अशी व्यक्ती एखादा गट (गुप) जमा करु शकेल व मग अशा जमावावर ती व्यक्ती आपलं वर्चस्व प्रस्थापित करु शकेल. परंतु या सर्वात कालांतराने असे आढळून येईल कि ती व्यक्ति परमेश्वरापासुन, सत्यापासून स्वतःवंचित होऊन तिचा -हास होतो. त्यानंतर त्या व्यक्तिचे सर्व अंकीत लोक सुध्दा सत्याला म्हणेच परमेश्वराला मुकतात व त्यांचा सुध्दा -हास होतो. असे सहजयोगात आल्यावर सुध्दा घडु शकते. या मुंबापुरीत अशा अनेक घटना वारंवार झालेल्या आहेत. याला ' योग-भ्रष्ट' म्हटले पाहिजे. यात एखादी व्यक्ती आपल्या योगापासुन च्युत होते कारण की सहजयोगात व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य असते व एखाद्या व्यक्तीची योगातील प्रगती किंवा अधोगती हे त्या व्यक्तिच्या स्वतंत्रतेवर अवलंबून असते. काही ख-या व महान गरुंच्याकडे वेगळया प्रकारची योग साधना शिकवली जाते. त्यामुळे साधकांचे अंतःशुध्दिकरण होते आणि जीवन लहानपणापासुन अतिशय शिस्तबध्द बनविले जाते. अशामुळे त्या साधकांचे जीवन अतीशय कष्टप्रद बनविले जाते व त्यांच्यत शारीरीक बाधा-खोड निर्माण केली जाते. व त्यांचा स्वभाव किंवा त्यांचे व्यक्तिमत्वच संपूर्णतया बदलून टाकले जाते. मात्र सहजयोगांत सर्व गोष्टी आपल्या स्वतंत्रतेवर अवलंबून आहेत. वर नमूद केलेल्या गोष्टी समजण्यासाठी आपण परमेश्वरी शक्तीशी सामुदायिकरित्या सतत जोडलेले रहाणे हे आवश्यक आहे.

प्रत्येक वस्तुचे निसर्गात व्यवस्थित नियमन केले जाते तसेच सहजयोगात सुध्दा आहे. सहजयोगात येऊन आपण दिखाऊगिरी करु शकत नाही किंवा एखाद्या विशेष गोष्टीसाठी गटबाजी करु शकत नाहीत. सहजयोगात आल्यानंतर अर्थातच अशा प्रकारच्या लोकांचे बिंग काही काळातच बाहेर पडते कारणकी अशी कृत्ये केल्याने त्यांच्या सर्वचक्रांवर फार पकड येते आणि त्याची जाणिव अशा व्यक्तींना नसते. फार काळ त्यांना सौंदर्य लहरींची जाणीव राहू शकते परंतु काही कालावधीतच अशा व्यक्तिचा पुर्णपणे -हास होतो.

अशा प्रकारची ' योगभ्रष्ट ' स्थिति कुणा सहजयोग्यास होणे ही अतिशय वाईट घटना आहे. एकतर योग घडणे हेच कठीण आहे व त्यातुनही यॉग घटीत झाल्यावर जर अशा प्रकारची योगभ्रष्ट स्थिती उत्पन्न होत असेल, तर ती व्यक्ती श्रीकृष्णांनी सांगितल्याप्रमाणे राक्षस योनीस जाते.

जी मंडळी सहजयोगात येतात त्यांनी त्यात जम धरुन टिकून राहीले पाहिजे नाहीतर ती योगास प्राप्त न होता कुठल्यातरी योनीत जाऊन पडतील. त्यानंतर कदाचित् अशा व्यक्ति परत मनुष्य जन्म घेऊ शकतील परंतु त्या व्यक्तीचे हे आयुष्य वायाच गेले. श्री कलकीदेवतेची शक्ती सहजयोग्यांच्या बाबत गुप्तपणे सतत (प्रत्येक क्षणी) कार्यान्वित असते.

श्री कलकी देवता सहजयोगाच्या पावित्र्याचे स्वतःच्या एकादश शक्तींनीशी संरक्षण करत असते, जे कोणी सहजयोगाच्या विरोधात कार्य करतील त्या सर्वांना अतिशय त्रास होईल. इतिहासाकडे दृष्टिक्षेप केला तर लोकांनी अनेक संत पुरुषांना त्रास दिला. परंतु आता तुम्ही संताना साधुलोकांना त्रास देऊ शकणार नाही कारण की श्री कलकीदेवतेची शक्ती पूर्णतया कार्यान्वित आहे. जो मनुष्य सज्जन आहे, संत आहे त्याला त्रास दिलात तर श्री कलकी शक्ती आपणास सळो की पळो करुन सोडणार आणि अशा वेळी आपणाला पळता भुई थोडी होईल.

वरील सर्व गोष्टी फक्त सहजयोगी मंडळींनांच तर जगातील सर्व लोकांना लागु आहेत आणि म्हणूनच तुम्ही सर्वानी सावध राहीले पाहीजे. इतरांना त्रास देऊ नका, इतरांच्या चांगूलपणाचा फायदा घेऊ नका. आणि स्वतःसचा दिमाख मिरवून फुशारक्या मारु नका. कारणकी जर श्री कलकी देवतेने आपल्या जीवनांत संहाराच्या कार्यास सुरुवात केली तर आपल्याला काय करावे व काय नाही ते सुचणार नाही.

तसेच त्यावेळेस तुम्ही अज्ञानामुळे किंवा अजाणतेपणे एखाद्या दुष्टप्रवृत्तीच्या माणसाला भजत असता किंवा त्याच्या संपर्कात असता, त्यावेळेस तुम्हाला यामुळे त्रास भोगावा लागतो. अशावेळी एखाद्या निष्पापी माणसाला सुध्दा त्रास होतो तेव्हा एखाद्या गैरव्यक्तिमुळे आपण भूलुन जाऊ नये आणि जर असे केले तर त्याची किंमत आपणांस मोजावी लागेल. ज्यावेळेस आपण एखाद्या गैर व्यक्तिमुळे प्रभावित होता त्यावेळेस आपण कुठेतरी तडजोड करत असतो. मग आपण विचार करतो की त्यात काय झालं? अमुक अमुक आमच्या पूर्वजांपासुन उपाध्याय आहेत. तेव्हा त्यांना आम्ही काही तरी देणं इष्ट आहे. आपण जरा विचार करा कि पवित्र प्रेमाची आनंदाची गंगामाई एक ठिकाणाहून वहात आहे आणि त्यांच्याच तीरावर बसून कोणीही परमेश्वराच्या नावावर आपणाकडून पैसे उकळावेत. किती वेडेपणा व अधोरीपणा चालला आहे? त्यातही आपणास

अस वाटतं की आम्ही त्या पुजाऱ्यांना पैसे देऊन किती पुण्य कमावलं?

अशा प्रकारे सत्य काय आहे हे समजून न घेता आपण अंधश्रध्देने जीवन जगत आहोत. हे प्रकार भारतातच नव्हे तर जगांत सर्वत्र पहाण्यांस मिळतात.

कित्येक गोष्टी अपण काय घडत आहेत हे नजरेने पहातो, तरी सुध्दा देवळांत जाऊन अंधश्रध्देने अनेक गोष्टी करतो. परमेश्वराच्या नावावर एकामागोमाग दुसरे अशी अनेक पापे आपण करत असतो पापक्षालन करण्याऐवजी आपल्या पापांची वृध्दीच करत असतो. अशा लोकांना मी 'तामसी' म्हणून संबोधते. अशी मंडळी त्यांचे डोके जरासुध्दा चालवत नाहीत. म्हणूनच त्यांना 'मुढ बुध्दी' चा म्हटले पाहिजे. अशी मंडळी कुणाही व्यक्तिकडे आकर्षित होतात किंवा कुणीही व्यक्तिकडे आकर्षित होतात किंवा कुणी त्यांना काही चमत्काराच्या गोष्टी सांगितल्यावर लगेच अशा व्यक्तिवर विश्वास ठेवतात. चमत्कार करणाऱ्या मंडळींनी परदेशांत जाऊन तर अनेक जणांकडून पैसे उकळले आहेत व त्या पैशाबद्दल त्यांनी, पक्षाघात किंवा डोकेदुखी वेडेपणा अशाप्रकारचे रोगही त्याबरोबर दिले. इतके असुनही अनेक जण अशा चमत्कार करणाऱ्या मंडळींच्या मागे वेड्यासारखी धावत आहेत व आपल्या पापात वृध्दी करुन घेत आहेत.

आपणाकडे जेवढा वेळ मिळाला आहे तो फार आणीबाणीचा व महत्वाचा आहे आणि त्यामुळे आपण स्वतःच्या आत्मसाक्षात्काराप्रित्यर्थ फार हुशार व सावध राहिले पाहिजे. यांत प्रत्येकाने दुसऱ्यावर विसंबुन चालणार नाही व स्वतःच साधना करुन परमेश्वराच्या हृदयातील अतीउच्च स्थान मिळविले पाहिजे. अर्थात यासाठी सहजयोगात येऊन स्वतःपार होणे आवश्यक आहे कारण की पार झाल्यानंतरच पुढे साधना करावयाची आहे.

ज्यावेळेस श्री कलकीशक्तीचे अवतरण होईल, त्यावेळेस ज्या मंडळींच्या हृदयात परमेश्वराबद्दल अनुकंपा व प्रेम नसेल किंवा ज्यांना आत्मसाक्षात्कार नको आहे अशा सर्वांचे हनन होणार त्यावेळेस मग श्री कलकी इतर कुणाची गय करणार नाहीत. ते अकरारुद्र शक्तिने सिध्द आहेत त्यामुळेच त्यांच्याकडे अकरा अती बलशाली विनाशशक्ती आहेत. तेंव्हा वृथा गोष्टीत आपण वेळ दवडू नका. तसेच गैर व्यक्तिच्या मागं लागू नका. चमत्कार दाखविणाऱ्या (अ) गुरु मागे देव देव म्हणून नाचू नका. जे योग्य आहे त्याचा अवलंब करा नाही तर श्री कलकी शक्ती आपल्या सर्व शक्तीनिशा संहार करण्यासाठी अवतार घेण्याची वेळ फार नजिक येऊन ठेपली आहे.

काही दुसऱ्या प्रकारची माणसे आपल्या हुशारीच्या जोरावर विचार करतात. त्यांनी सदैव परमेश्वराला नाकारलं आहे. अशी माणसं म्हणतात 'परमेश्वर कुठ आहे? परमेश्वर वगैरे काही नाही व हे सर्व थोतांड आहे. शास्त्र - विज्ञान म्हणजेच सर्व काही आहे.' मी म्हणते आतापर्यंत शास्त्रामुळं काय झालं. आपण पाहीलत तर लक्षात येईल कि शास्त्राने आतापर्यंत निर्जिव गोष्टी व्यतिरिक्त दुसरं काहीही केले नाही. शास्त्रामुळे आपण अहंकारी मात्र झालात. पाश्चिमात्य देशांत प्रत्येक माणूस अहंकारी आहे. पापवृध्दी कशी वावयाची या संबंधी निरनिराळ्या पध्दती ते शोधून काढत आहेत. घाणेरड्यातली घाणेरडी पापे कोणत्या प्रकारे करावयाची ह्या बद्दल ती मंडळी व्यस्त आहेत. त्यात भारतातून काही जण जे स्वतःला फार मोठे (अ) 'गुरु' म्हणवतात असे गुरु पाश्चिमात्य देशात गेले आहेत ते त्यांना अशा पापवृध्दीस मदत करीत आहेत. यामुळे अशी सर्वजण लवकरच नरकांत जाणार. जे काही चुक आहे ते चूकच आहे. जे आपल्या धर्माच्या विरोधात आहे ते काही चूक आहे मग ते काल आज किंवा उद्या १००० वर्षापूर्वीचे असो किंवा केव्हाही असो, ते सर्व चूकच आहे. हल्ली एक नवीन प्रकार दिसुनयेतो तो म्हणजे बरेच जण आपणास म्हणताना आढळतील की त्यांत काय झालं? त्यांत काय चुकल? अशा प्रकारच्या सर्व प्रश्नांची उत्तरे श्री कलकीशक्तीच देतील. मी फक्त परत एकदा आपणास ईशारा देत आहो कि 'गैरमार्गाचा अवलंब करु नका. जे तुमच्या उत्क्रांतीच्या विरोधात आहे त्याचा अवलंब करु नका. असे जर केले तर एक वेळ अशी येईल कि त्यावेळेस आपणाकडे केलेल्या कृत्याबद्दल पश्चाताप करण्यासाठी सुध्दा वेळ रहाणार नाही. त्यावेळेस त्यात काय झाल? त्यात काय चुकलं 'असे प्रश्न विचारण्यासाठी सुध्दा वेळ नसेल. क्षणार्धातच श्री कलकी आपला संहार करील' असं म्हणतात कि त्यावेळेस सर्व काही कार्य प्रचंड असेल. प्रत्येक व्यक्ति वेगळी निवडुन काढली जाईल. त्यावेळेस कुणालाही असे दाव्यानिशी सांगता येणार नाही कि पहा या सर्वांची जाहिरात झाली आहे, सर्व काही छापलेले आहे.

एखादा मायक्रोफोन जो सायन्समुळे निर्मिला गेला आहे तो देखील सहजयोग प्रसारासाठी वापरता येतो. जर मायक्रोफोन मी माझ्या चक्रांवर ठेवल तर त्या मायक्रोफोनमधून चैतन्य लहरी वाहतात व त्याचा प्रत्यक्ष अनुभव अनेकांनी घेतला आहे व घेऊ शकतात आणि त्या चैतन्य लहरींमुळे आपणास आत्मसाक्षात्कार प्राप्त होऊ शकतो. सपुर्ण विज्ञान सहजयोगाच्या उपयोगी पडणार आहे. काही दिवसापूर्वी दूरदर्शनाची काही माणसं माझ्याकडे आली व म्हणाली कि 'माताजी दूरदर्शनवर आम्हाला आपला कार्यक्रम करावयाचा आहे' त्यावेळेस मी त्यांना काहीही कार्यक्रम करण्यापूर्वी म्हटलं आपण सांभाळून रहा मला काही जाहीरातबाजी नको. म्हणून जे काही कराल ते योग्य प्रकारे करा ' दूरदर्शनाच्या माध्यमातून सहजयोग पसरु शकतो. ज्यावेळेस माझा दूरदर्शनवर कार्यक्रम असेल त्यावेळेस लोकांनी आपल्या घरातील दूरदर्शनाच्या संचासमोर हात पसरुन बसले तर अनेकांना आत्मसाक्षात्काराची अनुभूती मिळू

शकेल. ही वस्तुस्थिती आहे. माझ्या या शरीरातून चैतन्य लहरी बाहेर पडत आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्याबद्दल कुणालाही राग येण्याचं कारण नाहीं. किंवा जर मी अशाप्रकारची बनविली गेले आहे त्याबद्दल आपणास वाईट वाटण्याचे कारण नाही.

दुसरा प्रकार, अहंकारी व महत्वाकांक्षी लोकांच्या बाबतीत पहावयास मिळतो. एखाद्याकडे पुष्कळ पैसे आहेत अशा माणसाकडे एकदा जाऊन पहा व त्याला विचारा कि तो सुखी व आनंदी आहे कां? त्याच्या जीवनाचे विश्लेषण करुन पहा. जे स्वतःला अतीयशस्वी म्हणून म्हणवतात अशांच्याकडे जाऊन पहा, त्यांनी कोणते यश संपादन केले आहे? त्यांना किती जण मान देतात? त्यांची पाठ फिरताच कित्येक जण म्हणत असतील कि हे परमेश्वरा, याच्या पासून सुटका कर. आपण शुभ आहांत कां? आपल्या दर्शनाने इतरांना बरे वाटते कां? इतरांचे मंगल होते कां? आपण कल्याणमय आहांत का? आपण मंगलमय आहांत कां? हे पहा. आपलं व्यक्तिमत्व कोठल्या प्रकारचं आहे? स्वतःचा निर्णय स्वतःच करावयाचा आहे आणि हे सर्व सहजयोगातच घटीत होणार आहे.

आपण गैरमार्गाला गेलात तर आपल्या मधून अतीशय घाणेरडया प्रकारच्या लहरी येतात. आजाणते पणाने आपण अनेक पाप करत रहाल व तरीसुध्दा आपण मला म्हणाल कि, ' माताजी मला चैतन्यलहरी येत आहेत मी उत्तम आहे ' अशी माणसं स्वतःला व दुसऱ्यांना फसवितात. तुमचा निर्णय कोण करणार? तुमचंच कर्म, तुम्ही दुसऱ्यांवर किती उपकार केले?

एखाद्या मोहीनी विद्येच्या माणसावर भुलून जाऊन तुम्ही आपल्या घरातील इतरांची नासाडी करु इच्छिता कां? निदान घरातील इतर मंडळीचा विचार करा. समाजात अनेक प्रकारची गैर माणसं आहेत परंतु अशांना तिलांजली देणे सहजयोगात सहज शक्य आहे. लंडनमध्ये सुध्दा माझ्या माहितीत अनेक गैर प्रकारची, भुलवणारी माणसं आहेत. मी अशा लोकांना अनेकदा बजावलं आहे कि तुम्ही वाईट मार्ग सोडून द्या तुम्ही तत्काळ ओळखलं पाहिजे कि आपल्या आईला या सर्व गोष्टी कळतात. आणि जर आईने एखादी गोष्ट सांगितली तर ती ऐकली पाहिजे. त्यांच्यात वाद घालून होणार नाही. नाहीतरी वाद घालून आपणास चैतन्य लहरी मिळणार आहेत कां? असा विचार करा. पण अजूनही सहजयोगात येऊन सुध्दा तुम्ही चुका करु शकता आणि जर असं झालं तर ती फार वाईट गोष्ट आहे हे समजून घ्या, कारण कि अशा योगभ्रष्ट लोकांना गती मिळणार नाही.

मला सर्व सहजयोग्यांना सुध्दा ईशारा द्यावयाचा आहे, कारण की सहजयोगच अखेरीचा निर्णय आहे. तुम्ही परमेश्वाराच्या राज्यांत प्रवेश करण्यास योग्य आहात की नाही याचा निवाडा म्हणजेच सहजयोग आहे. तुम्ही सहजयोगात येऊन पार झाल्यावर परमेश्वराच्या राज्याचे नागरिक बनू शकता. त्या व्यतिरिक्त परमेश्वरी प्रेमाबद्दलचे ज्ञान व परमेश्वराबद्दलची संपूर्ण श्रध्दा इत्यादि समजून घेण्याची पात्रता सुध्दा नसते. समजा आपण भारतिय गणराज्याचे नागरिक आहोत व आपण एखादा गुन्हा केला तर आपण योग्य शिक्षेस पात्र ठरु शकतो तद्वतच परमेश्वराच्या राज्याबद्दल आहे व म्हणूनच परमेश्वरांच्या राज्याबद्दल आहे व म्हणूनच परमेश्वराच्या राज्याचे नागरिकत्व मिळाल्यांनतर आपण सर्वांनी फारच सावधतेने रहावयास हवे.

दुसरी गोष्ट मला आपणास सांगायची आहे ती म्हणजे श्री कलकी देवतेच्या विनाशशक्तीबद्दल. श्री कलकी अवतार अतीशय कठोर आहे. पूर्वी श्रीकृष्णाचा अवतार झाला. त्यांच्याकडे हनन शक्ती होती. त्यांनी कंस तसेच अनेक राक्षसांचा वध केला. लहान बाळ असतानाच पूतना राक्षसिणीला त्यांनी कंस मारलं हे ही आपणाला माहित आहे. पण श्रीकृष्ण लीला सुध्दा करत. ते अतीशय करुणामय होते त्यांनी लोकांना अनेक वेळा मोकळीक दिली. लोकांना क्षमा केली. श्री ख्रिस्त क्षमाशक्तीने संपूर्णपणे युक्त होते. क्षमा करणे हा श्री ख्रिस्तांमध्ये स्थित असलेला गुणधर्म आहे. परंतु त्या परमेश्वराची करुणा समजण्यास जर आपण असमर्थ ठरलो तर ह्या कलकी शक्तीचा स्फोट होईल व संपूर्ण क्षमाशीलता आपल्यावर एखाद्या संकटा प्रमाणे उलटून कोसळून पडेल. श्री ख्रिस्तांनी स्पष्टपणे सांगितले कि ' एकवेळ माझ्या विरोधात काहीही चालवून घेतले जाईल परंतु आदीशक्तीच्या विरोधात एकही शब्द चालवून घेतला जाणार नाही. ' वर निर्दिष्ट केलेल्या अनेक प्रकारच्या शक्तीनिशी सिध्द ,फार मोठे अवतरण नक्कीच होणार आहे. अशा अवतारी व्यक्तिकडे श्रीकृष्णमधील सर्व शक्ती ज्या फक्त हनन करतील, श्री ब्रह्मदेवामधील सर्व हनन शक्ती, श्री शिवामधील हननशक्ती अर्थात तांडवातील एक भाग अशा सर्व प्रकारच्या हनन शक्ती युक्त असतील. त्या अवतारी पुरुषाकडे श्री भैरवाचे खड्ग असेल, श्री गणेशांचे परशू असेल, श्री हनुमानांची गदा आणि विनाशाच्या सिध्दिअसतील. श्री बुध्दांची क्षमाशीलता व श्री महाविरांची अहिंसा शक्तीही उलटून कोसळेल, अशा अकरा शक्तीने युक्त श्री कलकीदेवतेचा अवतार होणार आहे. त्यावेळेस सगळीकडे हाहाकार उडून जाईल व त्यावेळेसच सर्वांचा निवाडा होणार आहे. त्यावेळेस सहजयोग सुध्दा कोणाला वाचवू शकणार नाही. कारण सहजयोगसुध्दा संपुष्टांत आलेला असेल. आपण सहजयोगातून सुध्दा वेगळं केले जाल आणि प्रत्येकजण परमेश्वरास योग्य असणारा निवडून काढला जाईल. बाकी लोक ठार केले जातील व ते हनन साध्या प्रकारचे नसून संपूर्ण समूळ नाशच असणार. पूर्वी देवीच्या अनेक अवतारांनी अनेक राक्षसांचं दहन केलं पण राक्षसांनी परत जन्म घेतला. मात्र आता समूळ नाश होणार आहे. जेणेकरुन पुनर्जन्माची शक्यता सुध्दा शिल्लक राहू शकणार नाही.

सध्याच्या घडीला परिस्थिती भिन्न आहे व ती समजण्याचा प्रयत्न आपण करा. पूर्वी श्रीकृष्णांनी म्हटलं की, यदा यदाही धर्मस्य ग्लानीर्भवती भारत , परीत्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृता संभवामी युगेनयुगे ॥ आता या श्लोकांतील शेवटच्या ओळींत श्रीकृष्ण सांगतात कि विनाशायच दृष्कृतां म्हणजेच दुष्ट लोकांचा , वाईट वृत्तीचा नाश करण्याकरीता व पुढे ते म्हणतात कि साधू सतांना बचवण्याकरिता मी पुन्हा पुन्हा जन्म घेणार आहे. ' कलीयुगात साधा , भोळा साधू-संत मनुष्य आढळणं कठीण कारण की अनेक राक्षसांनी मनुष्याच्या मेंदूच्या पेशीमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे धर्माच्या नावावर , राजकारणांत , शास्त्रांत , शिक्षणात प्रत्येक क्षेत्रांत आपण चांगल्या माणसाऐवजी जो वाईट असतो त्यावर विश्वास ठेवतो , जो वाईट कृत्य करतो त्याचा उदोउदो करता. एकदा कि आपण वाईट वृत्तिच्या माणसाची बाजू घेतली की आपली वृत्ती सुध्दा नकळतच चुकीच्या दिशेने जाऊ लागते व हे सर्व आपल्या मेंदूत अशा प्रकारे जड होऊन बसते कि आपण स्वतःला मेंदूत जड झालेल्या दृष्कृत्यापासून वेगळे करु शकत नाही. मग आपण ह्या दृष्कृत्यांपासून मुक्त कसे होणार? किंवा दृष्कृत्यांना नष्ट कसे करणार? आपण एखादे फार मोठे व चांगल्या स्वभावाचे गृहस्थ आहात परंतु आपल्या मेंदूत दुष्कृत्य जर जडस्वरुपात बसली असली तर तुमचा सुध्दा विनाश होणार त्यामुळे एखादा माणूस खरोखरीच परमेश्वरप्राप्तीसाठी पोषक किंवा विरोधी आहे कि नाही हे सांगण्यासाठी ठोस नियम सांगता येणार नाही. फक्त सहजयोगामुळेच मनुष्याची स्वच्छता होणार व त्यामुळे ती व्यक्ति परमेश्वरप्राप्तीसाठी नक्की पोषक बनविली जाऊ शकते. ही एकच पध्दत आहे कि ज्यामुळे आपणामधील अंकुरिशक्ती प्रस्फुटीत होऊन आपणास आत्मसाक्षात्कार प्राप्त होऊ शकतो. तुम्ही स्वतःला म्हणजेच तुमच्या मधील ' स्व ' ला जाणू शकाल आणि त्याचाच आनंद लुटू शकाल. ज्यावेळेस असा आनंद मिळतो त्यावेळेस इतर मिथ्या गोष्टी आपोआप गळून पडतात. आपणामधील भ्रम निघून जातील , आणि म्हणून आत्यावश्यक आहे कि आपण वेळ न गमावता, तावडतोव, संपूर्ण श्रध्देने ' सहजयोगाचा ' अंगीकार करावा. त्यामुळे मागील आयुष्यांत व भूतकाळांत केलेल्या चुका , पापं सर्वांपासून आपणास मुक्ती मिळेल. ही एकच गोष्ट आहे कि जी आपण आपल्या मित्रांना नातेवाईकांना व सर्वांना मुक्तपणे देऊ शकता.

काही जण लोकांना जेवणासाठी आमंत्रण देतात. लोक आपआपसांत काय देतात? काहीच नाही. फारतर एखाद्याचा वाढदिवस असला तर त्या निमित्त केक देतील. किंवा काही भेट देतील. ख्रिस्मसच्या वेळी लंडनमध्ये शुभेच्छा कार्ड पाठविण्याची प्रथा आहे आणि पोस्ट ऑफिसमध्ये अशा कार्डाचा जेव्हा ढीग येऊन पडतो त्यावेळेस इतर पत्रे , लोकांना १०-१० दिवस मिळत नाहीत. या सर्वात ख्रिस्ताच्या जन्मोत्सवी तेथील लोक श्री ख्रिस्तांना पूर्णपणे विसरलेली आहेत. उलट श्री ख्रिस्ताच्या जन्मदिनी ती माणसं शॅपेन नावाची दारु पितात. इतके; महामूर्ख लोक आहेत. कोणी मेलं तरी तिकडची माणसं शॅपेन पितात. इतकी घाण आहे की शॅपेन घेणे हा त्यांचा धर्मच होऊन बसला आहे.

त्यांना परमेश्वर सतजतच नाही , आणि समजणार तरी कसा? परमेश्वराबद्दल त्यांच्या मानांत कपोल कल्पित मिथ्या विचार आहेत. आपण फार सावध व काळजीपूर्वक रहा. ' स्वतःबद्दल खेळ खेळू नका. स्वतःचा विनाश करुन घेऊ नका. त्वरीत उठा ! जागृत व्हा. माझ्याकडे या मी आपल्याला मदत करीन. मी आपणासाठी रात्रंदिन मेहनत करण्यास तयार आहे. मी तुमच्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीन तुम्हाला बरं करण्यासाठी , तुम्हाला परमेश्वरप्राप्तीच्या मार्गावर आणण्यासाठी मी सर्व प्रयत्न करीन. परमेश्वरप्राप्तीसाठी अखेरच्या निवाड्याची परीक्षा पास करण्यासाठी मी आपणावर मेहनत घेईन , पण आपण यांत मला सहकार्य दिले पाहिजेत. हे सर्व मिळविण्यासाठी तुम्ही सुध्दा सर्वतोपरी प्रयत्न करावयास हवेत व जीवनातील जास्तीत जास्त वेळ सहजयोगात दवडला पाहिजे , सहजयोग जो फार मोलाचा आहे , जो फार महान आहे तो मिळविण्याठी व मिळविल्यावर आत्मसात करण्यासाठी आपण आपला वेळ घालवला पाहिजे.

वर जो सहजयोग सांगितला आहे ती सर्व जिवंत प्रक्रिया आहे. ज्यावेळेस नवीन माणसे सहजयोगाकडे वळण्याची शक्यता जरासुध्दा नसेल त्यावेळेस श्री.कलकी शक्तीचे अवतरण होईल. तेंव्हा कितीजण सहजयोगाकडे वळतात ते पाहू या. अर्थात किती मंडळी येणार आहेत त्यालाही मर्यादा आहे. म्हणून मी आपणास परत एकदा विनवून सांगते की आपली जेवढी मित्रमंडळी , नातेवाईक , शेजारी , पाजारी आहेत त्या सर्वांना घेऊन आपण सहजयोगात या.

ज्यावेळेस या मुंबापुरीत अनेक ,अगणित मंडळी अपार श्रध्देने , गंभीरपणे सहजयोगांत प्रस्थापित होतील , सहजयोगात येऊन आनंदाने गुण्या गोविंदाने , प्रेमाने रहातील त्यावेळेसच मला फार आनंद वाटेल या मुंबापुरीतील मंडळी येथे सा-या भारत देशातील सर्व हुशार विध्दान तात्विक मंडळी जास्त प्रमाणांत आहेत जी या भारतभूमीचे भूषण आहेतपण ती अजूनही हृदयाने लहान आहेत. त्यांना मला वरील गोष्टी मुद्दाम सांगावयाच्या आहेत कारणकी या नजीकच्या काळांत अनेक संकटे येणार आहेत. मी प्रार्थना करते की अशी संकटे येण्यास मुंबापुरीपासून सुरुवात न होवो. मुंबापुरी एकदा दोनदा तर संकटाच्या तोंडांत जाताजाता बचावली आहे. तेव्हा आता सावध रहा.

दुसरी गोष्ट म्हणजे अजूनही मुंबईच्या लोकांना माहीत नाही कि त्यांच्यावर कोणते संकट येऊन कोसळणार आहे. त्यांना हेही माहीत नाही कि परमेश्वराने माणसाला अमीबापासून मानवाच्या या स्थितीस कसे आणून ठेवले आहे किंवा परमेश्वर मिळविण्यासाठी

एक दुर्दैवी गोष्ट आहे, कारण की यादेशातील इतर भागातील मंडळी मुंबईतील लोकाचं अनुकरण करतात. बरीच लोक परमेश्वर प्राप्तीसाठी प्रयत्न करण्याऐवजी सिनेनट किंवा नटीचं अनुकरण करण्यात मग्न आहेत. हा सर्व उथळ स्वभावाचा मनोवृत्तीचा भाग आहे.

श्री कलकी शक्तीचे स्थान आपल्यसामध्ये कपाळावरील भालप्रदेशावर आहे. ज्यावेळेस श्री कलकीशक्तीचे चक्र पकडले जाते त्यावेळेस अशा लोकांचे संपूर्ण डोके जड झाल्यासारखे वाटते. ते कुंडलिनी शक्तीस आपल्या हंसचक्रापलीकडे जाऊ देण्यास असमर्थ असतात. अशा माणसांमध्ये कुंडलिनी शक्ती फार तर आज्ञाचक्रापर्यंत येऊ शकते. पण परत कुंडलिनी खाली पडते. पूर्वी सांगितल्याप्रमाणे जर आपण आपलं डोकं अगुरु किंवा गैर लोकांच्या पायावर ठेवले असेल तर आपली स्थिती सुध्दा वर विर्णिल्याप्रमाणे होऊ शकते. व त्यामुळे श्री कल्की शक्तीचा एक भाग खराब होऊ शकतो त्यामुळे एका बाजूचे असंतुलन निर्माण होते. जर संपूर्ण कपाळावर एक दोन टेंगळं असली तर समजावं कि आपणामधील श्री कलकीचक्र दूषित आहे. जर श्री कलकी चक्र दूषित असेल तर अशी व्यक्ति लवकरच फार मोठया संकटात सापडण्याची शक्यता असते. ज्यावेळेस आपल्या कलकी चक्रावर पकड असेल त्या वेळेस आपल्या हातातली सर्व बोटांत, तळहातावर व शरीरभर बाजवीपेक्षा जास्त गरमी जाणवते. एखाद्या व्यक्तिचे श्री कलकी शक्तीचे चक्रावर पकड बसली नसेल तर अशी व्यक्ती कर्करोग किंवा महारोग या सारख्या रोगाने पीडीत होणार किंवा अशा व्यक्तिवर महासंकट कोसळण्याची दाट शक्यता. म्हणून श्री कलकी चक्र फार स्वच्छ ठेवले पाहिजे. या चक्रात ११ इतर लहान चक्र असतात. म्हणून हे चक्र स्वच्छ ठेवण्यासाठी ,ह्या चक्रातील ११ पैकी जास्तीत जास्त चक्र स्वच्छ ठेवणं हितावह आहे त्या मुळे त्याचं चक्रातील इतर लहान बिघडलेली चक्रं चालित करिता येतील. जर सर्वच्या सर्व ११ चक्रांवर पकड असेल तर मात्र अशा व्यक्तिस आत्मसाक्षात्कार देणें फारच कठीण होईल.

आता श्री कलकी शक्तीचे चक्र स्वच्छ ठेवण्यासाठी काय केलं पाहिजे ते पाहू या. प्रथम म्हणजे आपणास परमेश्वराविषयी अत्यंत आदर प्रेम व तसेच त्याचा दरारा दोन्हीही असेले पाहिजे. जर आपणास परमेश्वराबद्दल प्रेम नसेल, आदर नसेल किंवा एखादी चूक किंवा पाप करत असल्यास त्याबद्दल परमेश्वराचा धाक नसल्यास श्री कलकीशक्ती आपल्या अती क्षोभाने सज्ञ आहे. जर आपण एखादी चूक किंवा पाप करत असाल व त्याबद्दल आपणांस परमेश्वराचा जरा सुध्दा धाक नसेल तर हे दैवत आपणासाठी अतिशय कडक किंवा जहरी आहे. हे आपण लक्षांत ठेवा. आपण जर एखादी चूक किंवा पाप करत असाल तर त्यांत माझ्यापासून किंवा इतर कोणापासूनही लपून ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मात्र तुम्हाला स्वतःला कळते कि आपण पाप करीत आहोत. जर आपण पाप करत असाल आणि तुमच्या हृदयातून तुम्हाला असं वाटत असेल कि आपण काही चूक करीत आहोत तर कृपया अशी कोणतीही गोष्ट करु नका.

ज्यावेळेस आपणामध्ये परमेश्वरासाठी प्रेम असते आदर असतो व त्यापासून भीती किंवा धाक असतो त्यावेळेस आपणामध्ये जाणीव निर्माण होते कि परमेश्वरच सर्वशक्तीमान आहे. व तोच आपला संभाळ करीत आहे, तोच आपला उध्ध्दार करण्यास शक्तिमान आहे, ती त्याच्या शक्तीमुळे आपणावर कृपा आशिर्वाद वर्षावतो. (परमेश्वर) अतीशय करुणायम आहे किती करुणामय आहे याची कदाचित् आपणास कल्पना सुध्दा येणार नाही. तो करुणेचा सागर आहे. परंतु परमेश्वर जितका करुणामय आहे. तितकाच कोपीष्ट सुध्दा आहे. जर त्यांचा कोप झाला तर मात्र बचावणे महामुश्किल होय. मग त्यांना कोणहीही थांबवू शकणार नाही. माझ्या प्रेमाची हांक सुध्दा त्यावेळेस ऐकली जाणार नाही. कारण त्यांवेळेस तो म्हणू शकेल कि आई तुम्ही मुलांना मोकळीक दिलीत म्हणून मुलं बिघडली' म्हणून मी तुम्हाला सांगू इच्छिते कि कुठलही गैर किंवा वाईट कृत्य करु नका आणि त्यामुळे मला वाईटपणा आणू नका. कारणकी तुमच्या आईचं हृदय इतकं प्रेमळ, इतकं नाजूक आहे कि ह्या सर्व गोष्टी तुम्हाला सांगणं म्हणजे मला फार कठीण वाटतं. मी तुम्हाला विनवून सांगेन कि आता वेळ व्यर्थ घालवू नका कारण की पितामह परमेश्वर फार कोपिष्ठ आहेत. तुम्ही कुठलेही वाईट कृत्य केल्यास ते तुम्हाला शिक्षा करतील. जर आपण त्यांच्यासाठी (परमेश्वराप्रित्यर्थ) काही केले किंवा स्वतःच्या आत्मसाक्षाकाराप्रित्यर्थ किंवा स्वतःच्या आत्मसाक्षात्काराप्रित्यर्थ काही केले तर मात्र आपणास परमेश्वराच्या राज्यात अतीउच्चपद मिळेल.

आज आपण एखादे लखपती असाल, आपण अतीशय श्रीमंत असाल किंवा फार मोठे पुढारी किंवा तसेच काही, परंतु जे परमेश्वराला प्रिय आहेत, जे परमेश्वराला मान्य आहेत अशांनाच उच्चतम पदावर परमेश्वराच्या राज्यात विराजमान केले जाईल. आपण श्रीमंत किंवा लक्षाधिश झालात म्हणजे परमेश्वराच्या राज्यात प्रवेश मिळेलच असा आपला विचार असल्यास तो चुकीचा आहे. सर्वात मुख्य म्हणजे ' परमेश्वर ' प्राप्तीसाठी आपण कुठे आहोत हे पाहून प्रथम आपला परमेश्वराशी संबध घटीत होणे आवश्यक आहे, स्वतःचा आत्मा कुठे आहे? आणि परमेश्वराशी आपण कशा प्रकारे संबंधीत होऊ शकतो या सर्व गोष्टींचा उलगडा सहजयोगास प्राप्त झाल्यानंतरच होतो. वाचकांनी सहजयोगात येऊन आपला सर्वतोपरी उत्कर्ष साधून आपलं कल्याण करुन घ्यावे.

सर्वांना अनंत आशिर्वाद.